सांध्य दैनिक
# विदर्भ प्रजासत्ताक
https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026
❑ वर्ष - ३ रे ❑ अंक - ३७ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ मंगळवार दि. २५ फेब्रुवारी २०२५ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६

## महाकुंभातील उद्याला शेवटचं स्नान प्रयागराजमध्ये भाविकांची तुंबळ गर्दी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२५प्रयागराज**

प्रयागराज येथील महाकुंभाचा समारोप उद्या होणार आहे. २६ फेब्रुवारी रोजी महाशिवरात्रीला होणाऱ्या महाकुंभाच्या शेवटच्या स्नान महोत्सवादरम्यान गर्दीचे व्यवस्थापन करण्यासाठी प्रशासन सज्ज आहे. २५ फेब्रुवारीपासून मेळा परिसरात आणि शहरात वाहनमुक्त क्षेत्र लागू करण्यात आलंय. तसंच, संपूर्ण शहरात मोठा पोलिस बंदोबस्त तैनात करण्यात आलाय. महाकुंभाच्या शेवटच्या स्नान महोत्सवात ३ कोटींहून अधिक भाविक संगमाला भेट देतील, असा अंदाज प्रशासनाने वर्तवला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार २५ फेब्रुवारी २०२५ रोजी पहाटे ४ वाजल्यापासून मेळा परिसर वाहनमुक्त क्षेत्र म्हणून घोषित करण्यात आलाय. तर प्रयागराज आयुक्तालय सायंकाळी ६ वाजल्यापासून वाहनमुक्त क्षेत्र म्हणून घोषित केले जाईल. अधिकाऱ्यांनी सांगितलं की, ही व्यवस्था राखण्यासाठी सर्वांना मदत करण्याची विनंती करण्यात आलीय. गर्दीचे व्यवस्थापन




सुरळीत राहावे यासाठी, सर्वांना प्रवेशद्वाराजवळील घाटावरच स्नान करण्याचं आवाहन करण्यात आलंय.

**भाविकांच्या स्नानासाठी प्रशासनाचा मास्टर प्लॅन**

महाकुंभ प्रशासनाने चारही दिशांनी येणाऱ्या भाविकांच्या संख्येनुसार स्नान योजना तयार केलीय. दक्षिण झुसीहून येणारे भाविक संगम द्वार ऐरावत घाटावर स्नान करू शकतील. उत्तर झुसीहून येणारे भाविक संगम हरिश्चंद्र घाट आणि संगम जुना जीटी घाट येथे स्नान करतील. तसेच, परेडमधून येणारे भाविक संगम द्वार भारद्वाज घाटावर स्नान करू शकतील. संगम गेटवरून येणारे नागवासुकी घाट, संगम गेट मोरी घाट, संगम गेट काली घाट, संगम गेट राम घाट, संगम गेट हनुमान घाट येथे स्नान करतील. अरैलहून येणारे भाविक संगम द्वार अरैल घाटावर स्नान करतील.

**अत्यावश्यक सेवांसाठी सूट**


औषधे, दूध, भाज्या, रुग्णवाहिका आणि सरकारी कर्मचाऱ्यांच्या (डॉक्टर, पोलिस, प्रशासन) वाहनांवर कोणतेही बंधन राहणार नाही. महाकुंभ महोत्सवाचा समारोप २६ फेब्रुवारी २०२५ रोजी महाशिवरात्रीच्या मुहुर्तावर होणार आहे. भाविकांना जवळच्या घाटावर लवकर स्नान करण्याची, शिव मंदिरात दर्शन घेण्याची आणि नंतर त्यांच्या गंतव्यस्थानाकडे जाण्याची विनंती करण्यात आली आहे.

भाविकांना आवाहन करण्यात आलंय की, सर्व घाट संगमासारखे आहेत. म्हणून भाविकांनी जवळच्या घाटावर स्नान करावे आणि वाहतूक आणि गर्दी व्यवस्थापनात सहकार्य करावे. महाकुंभ २०२५ दरम्यान भाविकांची प्रचंड गर्दी आणि कामकाजाच्या कारणांमुळे, भारतीय रेल्वेने काही गाड्या रद्द करण्याचा निर्णय घेतलाय. प्रवाशांची सुरक्षितता आणि गर्दी व्यवस्थापन लक्षात घेऊन हे पाऊल उचलण्यात आलंय.

## शीखविरोधी दंगल: सज्जन कुमारला जन्मठेपेची शिक्षा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२५नवी दिल्ली**

दिल्लीच्या राऊस एव्हेन्यू कोर्टाने १९८४ च्या शीख विरोधी दंगलीप्रकरणी दोषी ठरलेले काँग्रेस नेते सज्जन कुमार यांना जन्मठेपेची शिक्षा सुनावली आहे. न्यायालयाने २१ फेब्रुवारी रोजी शिक्षेवरील निर्णय राखून ठेवला होता. दंगलीदरम्यान सरस्वती विहारमधील जसवंत सिंग आणि त्यांचा मुलगा तरुणदीप सिंग यांच्या हत्येशी संबंधित हे प्रकरण आहे. त्यावेळी सज्जन कुमार दिल्ली लोकसभा मतदारसंघातून काँग्रेसचा खासदार होता.



**फाशीची शिक्षा देण्याची मागणी**

१९८४ च्या शीख विरोधी दंगलीत सज्जन कुमारने केलेल्या जमावाच्या हल्ल्यात जसवंत सिंग आणि त्यांचा मुलगा तरुणदीप सिंग यांची १ नोव्हेंबर १९८४ रोजी हत्या करण्यात आली होती. याप्रकरणी मृत जसवंत यांच्या पत्नीच्या तक्रारीच्या आधारे पोलिसांनी सज्जन कुमार याच्याविरोधात गुन्हा दाखल केला होता. अनेक वर्षांनंतर आता आज याप्रकरणी आरोपीला शिक्षा झाली आहे. विशेष म्हणजे, दिल्ली दंगलीशी संबंधित आणखी एका प्रकरणात सज्जन कुमार जन्मठेपेची शिक्षा भोगत आहे.

## आप सरकारच्या मद्य धोरणामुळे दिल्लीला २००० कोटींचे नुकसान; कॅगचा धक्कादायक अहवाल

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२५नवी दिल्ली**

दिल्लीमध्ये भारतीय जनता पक्षाचे सरकार आल्यानंतर आता आप सरकारच्या काळातील फाईली बाहेर निघायला सुरुवात झाली आहे. काल(२४ फेब्रुवारी) दिल्ली विधानसभेचे अधिवेशन सुरू झाले, तर आज दिल्लीच्या मुख्यमंत्री रेखा गुप्ता यांनी आपच्या काळात आणलेल्या मद्य धोरणाबाबत कॅगचा अहवाल विधानसभेत मांडला. दिल्ली मद्य धोरणात बदल झाल्यामुळे राज्याला २ हजार कोटी रुपयांचे नुकसान झाल्याची धक्कादायक माहिती या अहवालातून समोर आली आहे.



मद्य धोरणाबाबत कॅगचा हा अहवाल २०१७-२०१८ ते २०२०-२०२१ या चार कालावधीसाठी आहे. कॅगच्या या अहवालात २०१७-१८ ते २०२१-२२ दरम्यान मद्याचे नियमन आणि पुरवठा तपासण्यात आला आहे. याशिवाय २०२१-२२ च्या उत्पादन शुल्क धोरणाचाही आढावा घेण्यात आला आहे. विधानसभेत सादर करण्यात आलेल्या या अहवालात दिल्लीच्या मद्य धोरणात झालेल्या बदलामुळे २ हजार कोटी रुपयांचे नुकसान झाल्याचे समोर आले आहे.

कॅगच्या अहवालानुसार फेब्रुवारी २०१० मध्ये दिल्ली मंत्रिमंडळाने मद्याची तस्करी रोखण्यासाठी दिल्लीत विकल्या जाणाऱ्या प्रत्येक बाटलीला बारकोड करण्याचा निर्णय घेतला होता. परंतु हे काम एक इम्प्लीमेन्टिंग एजन्सी (ख-) उत्पादन शुल्क पुरवठा साखळी माहिती प्रणाली प्रकल्पांतर्गत करेल असा निर्णयही घेण्यात आला. कॅगच्या अहवालात असे सांगण्यात आले की, झालेल्या करारानुसार टीसीएसला प्रत्येक बाटलीसाठी १५ पैसे मिळणार होते. नियमानुसार दारूच्या दुकानात विकल्या जाणाऱ्या प्रत्येक बाटलीचा बारकोड स्कॅन करणे गरजेचे होते. मात्र, मार्च २०२१ पर्यंत एकूण ४८२.६२ कोटी बारकोड विकले गेले अन् केवळ ३४६.०९ कोटी स्कॅन झाले. म्हणजे उर्वरित १३६.५३ कोटी रुपये स्कॅनिंगशिवाय विकल्याचे दाखवण्यात आले. आम आदमी पार्टी सरकारच्या नवीन दारू धोरणात पारदर्शकतेचा पूर्ण अभाव असल्याचे अहवालात म्हटले आहे. याचा फायदा दारू माफियांना झाला. त्यांनी बाजारात मक्तेदारी निर्माण केली आणि सरकारचे हजारो कोटींचे नुकसान झाले.

## ऐन उन्हाळ्यात राजकारण तापणार, ठाकरेंच्या शिवसेनेचा राज्यव्यापी दौरा २ मार्च पासून होणार सुरू

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२५मुंबई**

आगामी लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाने राज्यव्यापी दौऱ्याची घोषणा केली आहे. २ मार्च रोजी ठाण्यातून या दौऱ्याचा प्रारंभ होणार आहे. या दौऱ्याची सुरुवात शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचे कट्टर समर्थक आनंद दिघे यांच्या स्मृतीस्थळी अभिवादन करून होईल. हा दौरा ठाकरे गटासाठी अत्यंत



महत्त्वाचा मानला जातोय. त्याद्वारे पक्षाच्या संघटनात्मक ताकदीचे दर्शन घडवण्याचा आणि भाजप-शिंदे गटाला कोंडीत पकडण्याचा प्रयत्न केला जाणार आहे.

ठाकरेंच्या शिवसेनेने गेल्या काही महिन्यांत अधिक आक्रमक भूमिका घेतली आहे. राज्यातील अनेक प्रश्नांवर सत्ताधारी शिंदे-फडणवीस सरकारला घेरण्याची रणनिती या दौऱ्यात आखण्यात येणार आहे. मराठी अस्मिता, महागाई, कायदा-सुव्यवस्था, बेरोजगारी आणि शेतकऱ्यांचे प्रश्न या मुद्द्यांवर सरकारवर टीकेची झोड उठवली जाणार आहे.

विशेष म्हणजे, ३ मार्चपासून राज्याचे अर्थसंकल्पीय अधिवेशन सुरू होत असताना ठाकरे गटाने दौऱ्याची घोषणा केली आहे. त्यामुळे सभागृहात नेते सरकारला घेरतील आणि मैदानात कार्यकर्ते जनतेशी थेट संवाद साधतील, अशी रणनीती आखण्यात आली आहे.

या दौऱ्यातून भाजप आणि शिंदे गटाला स्पष्ट संदेश देण्याचा प्रयत्न होणार आहे. राज्यातील सत्तांतरानंतर उद्धव ठाकरे यांना प्रत्यक्ष भेटण्यासाठी जनतेत मोठी गर्दी उसळली होती. हा दौरा देखील कार्यकर्त्यांमध्ये उत्साह निर्माण करेल, असा विश्वास शिवसेना ठाकरे गटाच्या नेत्यांना आहे. आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीच्या रणनीतीचा भाग म्हणून या दौऱ्याकडे पाहिले जात आहे. राजकीय वातावरण अधिक तापणार असल्याचं दिसतंय.

## ओएसडी म्हणून फिक्सरची नावे पाठवणारे १३ मंत्री शिंदेंचे, नावे जाहीर करणार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२५मुंबई**

माझ्याकडे १२५ नावे आली असून त्यातील १०९ नावांना मंजुरी दिली आहे. उर्वरित नावांना मी मंजुरी दिली नाही. मंत्रालयात त्यांच्याबद्दलचे मत फिक्सर असं आहे. कोणी नाराज झालं तरी ही मी अशा नावांना मान्यता देणार नाही, अशी रोखठोक भूमिका मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घेतली आहे. या भूमिकेचे खासदार संजय राऊत यांनी स्वागत केले. त्याचबरोबर ही नावे पाठवणारे शिंदे गटाचे आहेत, असा स्फोटक दावा राऊत यांनी केला. मुंबईत माध्यमांशी बोलताना खासदार संजय राऊत यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या भूमिकेचं स्वागत केले.

**'ती नावे तुम्ही जाहीर करा'**

संजय राऊत म्हणाले, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी एका मंत्र्याला दम देताना सांगितले आहे की, ओएसडी आणि पीए नियुक्तीसंदर्भात. जी यादी आली




मंत्र्यांकडून त्यातील १६ जण दलाल आणि फिक्सर होते. माझं मुख्यमंत्र्यांना आणि राज्याच्या मुख्य सचिवांना आवाहन आहे की, कोणत्या मंत्र्याने आपला ओएसडी किंवा पीए म्हणून अशा फिक्सरची नावे पाठवली होती, ती तुम्ही जाहीर करा. महाराष्ट्राच्या हितासाठी, अशी मागणी खासदार संजय राऊत यांनी केली.

हे कोण फिक्सर आहेत? हे जे दलाल, फिक्सर आहेत, त्यांची जी नावे पाठवली, माझ्या माहितीप्रमाणे हे सर्व मंत्री शिंदे गटाचे आहेत. म्हणजे शिंदेंच्या पक्षाचे. शिंदेंचा पक्ष हा अमित शाहांचा पक्ष आहे. हे सगळे शिंदे गटाच्या मंत्र्यांकडून गेले, असा दावा संजय राऊत यांनी केला.

**माझ्याकडे १६ जणांची नावे आहेत – संजय राऊत**


खासदार राऊत पुढे बोलताना म्हणाले की, मी नावे देईन. माझ्याकडे १६ जणांची नावे आहेत. यात १३ शिंदेंचे आहेत आणि उरलेले अजित पवार गटाचे आहेत. मी मागेही म्हटलो होतो की, अजित पवारांना त्यांच्या मर्यादा माहिती आहेत. अजित पवार पाप धुवायला, प्रयागराजला गेले नाहीत. त्यांना माहिती आहेत की महाराष्ट्रात पाप धुवायला नद्या आहेत, अशी टीका संजय राऊत यांनी केली.

## महापालिका निवडणुका पुन्हा लांबणीवर! आता ४ मार्चला सुनावणी

**विदर्भ प्रजसत्ताक**
**दि.२५अमरावती**

महापालिका निवडणुकीच्या संदर्भात सर्वोच्च न्यायालयात दाखल याचिकेवर आता ४ मार्च रोजी सुनावणी होणार आहे. त्यामुळे राज्यातील महापालिकेच्या रखडलेल्या निवडणुका पुन्हा लांबणीवर पडल्या आहेत. त्यामुळे इच्छुकांचा हिरमोड झाला आहे.

महापालिका निवडणुका रखडल्याने राज्यातील मुंबई, पुणे, पिंपरी-चिंचवडसह तब्बल २३ महापालिकांवर प्रशासकीय राजवट आहे. प्रभाग रचना, लोकसंख्येत १० टक्के वाढ धरून निश्चित केलेली सदस्य संख्या आणि ओबीसी आरक्षण यावरून तब्बल ५७ वेगवेगळ्या याचिका सुप्रीम कोर्टात दाखल आहेत.त्यावर एकत्रित



सुनावणी २२ जानेवारी रोजी होणार होती. मात्र, बुधवारी होणाऱ्या सुनावण्यांच्या यादीत या याचिकांचा समावेश नव्हता. त्यानंतर २८ जानेवारी रोजी सुनावणी झाली नाही. पुढील सुनावणी २५ फेब्रुवारी म्हणजे आज होती. पण आजही सुनावणी झाली नाही. त्यामुळे या याचिकेवर आता ४ मार्च रोजी सुनावणी होणार आहे.

## इंद्रजित सावंतांना धमकी, देवेंद्र फडणवीसांनी थेट कोल्हापूरच्या एसपींना लावला फोन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२५मुंबई**

इतिहास अभ्यासक आणि संशोधक इंद्रजित सावंत यांनी छत्रपती संभाजी महाराजांच्या इतिहासाबाबत केलेल्या मांडणीवरुन त्यांना धमकी देण्यात आल्याचा प्रकार समोर आला आहे. तुम्हाला घरात घुसून मारु, अशी धमकी त्यांना देण्यात आली आहे. डॉ. प्रशांत कोरटकर नावाच्या व्यक्तीने इंद्रजित सावंत यांना फोनवरुन धमकी दिल्याची माहिती समोर आली होती.




मात्र, या व्यक्तीने आपण इंद्रजित सावंत यांना धमकी दिल्याचा आरोप फेटाळून लावला. माझ्या नावाने कोणीतरी खोडसाळपणा केला असावा, असे कोरटकर यांनी म्हटले. मात्र, इंद्रजित सावंत यांना देण्यात आलेल्या धमकीचे प्रकरण राज्याच्या गृहखात्याने गांभीर्याने घेतले आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी कोल्हापूर जिल्ह्याच्या पोलीस अधीक्षकांशी फोनवरुन चर्चा केली आहे. इंद्रजित सावंत यांना आलेल्या फोन कॉलची चौकशी करण्याचे आदेश गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले आहेत. त्यामुळे आता याप्रकरणात कारवाईला वेग येणार आहे. प्रशांत कोरटकर यांनी त्यांनी फोन केल्याचे नाकारल्यामुळे इंद्रजित सावंत यांना फोन करुन धमकी देणारी व्यक्ती कोण आहे, याबद्दल सर्वांना उत्सुकता आहे.

## संपादकीय ......

# एक गाडी तीन ड्रायव्हर

राज्यात सध्या एक मुख्यमंत्री आणि दोन उपमुख्यमंत्री आहेत. या दोन उपपैकी एक माजी मुख्यमंत्री आहेत आणि दुसरे उप मतेफ पद कधी ना कधी मिळेल या आशेवर आहेत. एका राज्यात, एक मुख्यमंत्री आणि दोन उपमुख्यमंत्री असण्याची कल्पना अगदी तशीच आहे जशी एका गाडीला तीन चालक असावेत. मुख्यमंत्री अर्थातच स्टेअरिंग सांभाळतात; पण दोन उपमुख्यमंत्री म्हणजे दोन बाजूंनी 'तुम्ही उजवीकडे वळा, नाही नाही डावीकडे वळा' असं सांगणारे असणारच. तिघांमधल्या या सार्या चर्चेत गाडी नेमकी कुठे जाते, हे बघायला मजा येत आहे. शेवटी, जनता म्हणते, 'चालक कितीही असले तरी गाडीने रस्त्यावरूनच जायचं, बाकी आम्हाला काही नको'. गमतीदार असा हा एक राजकीय प्रवास आहे.या सेटअपचे काही फायदे आहेत, तर काही तोटेही आहेत. फायदा असा की जबाबदारी विभागली जाते. एकाला विकासकामांकडे लक्ष द्यायला वेळ मिळतो, दुसर्याला योजना अंमलात आणायला संधी मिळते आणि तिसर्याला सर्व काही करताना सत्तेचा आनंद अनुभवता येतो. कधी कधी असेही होते की निर्णय घेताना एवढी चर्चा होते की शेवटी कोणताही एक निर्णय होत नाही. एका प्रवासात तीन चालक असतील, तर प्रत्येक जण वेगवेगळ्या दिशांना गाडी वळवण्याचा प्रयत्न करतो आणि परिणाम असा होतो की गाडी जागेवरच उभी राहते.जनतेच्या दृष्टीने विचार केला तर, या व्यवस्थेचा परिणाम थेट त्यांच्या जीवनावर पडतो. कधी एक मंत्री काही घोषणा करतो, तर दुसरा त्यावर विचार करतो आणि तिसरा म्हणतो 'हे आधीच्या सरकारनेही केलं होतं'. त्यामुळे काम सुरू होण्याआधीच त्यावर चर्चा, वादविवाद आणि फेरतपासणी सुरू होते. जनतेला त्यामुळे प्रत्यक्ष लाभ मिळायला वेळ लागतो. काही लोकांना ही व्यवस्था स्थिर वाटते, तर काहींना ती निर्णयक्षमतेच्या अभावामुळे त्रासदायक वाटते. राजकारण हे शेवटी गणितासारखे आहे. आकडे जुळले की सरकार टिकते, नाही जुळले तर सत्ता ढासळते. त्यामुळे 'एका मुख्यमंत्र्याला दोन उपमुख्यमंत्री' हा फॉर्म्युला कितपत यशस्वी ठरतो, हे राज्याच्या राजकीय गणितावरच अवलंबून आहे. जनता मात्र शेवटी एका गोष्टीवर ठाम असते. जनतेला केवळ चांगल्या रस्त्यांवर गाडी चालवणारा चालक हवा असतो, चालक कितीही असले तरी हरकत नाही, विद्यमान मुख्यमंत्री श्रीमान फडणवीस यांनी आता राज्यकारभाराची चांगली ग्रीप घेतली आहे. दोन्ही उपमुख्यमंत्र्यांना सांभाळत, चुचकारत त्यांची वाटचाल उत्तम पद्धतीने सुरू आहे. गाडी वेगाने धावावी एवढीच जनतेची इच्छा आहे. हे तिन्ही शीर्षस्थ नेते एकत्र येऊन कारभार करतील तर राज्याच्या प्रगतीचा गाडा वेगाने धावायला लागेल. लोकांना बाकी काय पाहिजे असते? तेवढेच तर पाहिजे असते. सध्याच्या राजकारणात अपरिहार्यता वाढत चालली आहे. विशेषतः संयुक्त सरकार असेल तर टेकू देणार्यांची मर्जी सांभाळावी लागते. यातच बहुंताश वेळ श्रेष्ठींचा जात असतो. सरकार कितीही चाकांचे असो देशाच्या आणि राज्याच्या विकासाचे चाक मात्र रूतता कामा नये, याची किमान काळजी सर्वांनी घ्यावी लागेल. हे विकासाचे चाक थांबल्यास त्याचे गंभीर परिणाम जनतेला भोगावे लागतात हे विसरता कामा नये.

विदर्भ प्रजासत्ताक

# खेडोपाडी बचत गटांचे जाळे विणणाऱ्या 'माविम'चा सुवर्णमहोत्सव

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२५ अकोला,** – महिला आर्थिक विकास महामंडळाची स्थापना आंतरराष्ट्रीय महिला वर्षानिमित्त १९७५ मध्ये करण्यात आली. खेडोपाडी बचत गटांचे जाळे विणणा–या 'माविम'च्या स्थापनेला ५० वर्षे पूर्ण झाली असून, जिल्ह्यात ४५ हजारहून अधिक भगिनी बचत गटांशी जोडल्या गेल्या आहेत.महिलांच्या सर्वांगीण विकासाचे महत्व व महामंडळाची या कामातील वाटचाल लक्षात घेऊन शासनाने २० जानेवारी २००३ रोजी महामंडळाला महिला विकासाची राज्यस्तरीय शिखर संस्था म्हणून घोषित केले आहे. महामंडळातर्फे जिल्ह्यात २९१ गावात गाव विकास समितीची स्थापना करण्यात आली असून, ४ हजार ४२० महिला बचत गटांची निर्मिती करण्यात आली आहे . त्यात २ हजार ३४९ ग्रामीण व २ हजार ७१ शहरी गट आहेत, अशी माहिती महामंडळाच्या जिल्हा समन्वय अधिकारी वर्षा खोब्रागडे यांनी दिली.खेड्यापाड्यातील २५ हजार ११ व शहरांतील २१ हजार ४३९ गरीब व गरजू महिला बचत गटांशी जोडल्या गेल्या आहेत. गरीब, गरजू, घटस्फोटित, परितक्त्या , विधवा, वंचित महिलांना गटांमुळे आधार मिळाला आहे. जिल्ह्यात नऊ लोकसंचालित साधन केंद्रे आहेत. त्याद्वारे ४६ हजार ४५० महिलांचे संघटन झाले आहे. त्याची एकूण बचत ४६ कोटी ३८ लक्ष रु. आहे.बचत गटांना आतापर्यंत बँकेद्वारे २४३ कोटी ५८ लक्ष रु. पुरवठा करण्यात आला आहे.सन २०२४–२०२५ मध्ये १ हजार २२५ गटांना ३९ कोटी २० कोटी रुपये कर्ज मिळाले आहे . त्यात शेतीआधारित व्यवसाय करणाऱ्या २० हजार ३१९ आणि बिगर शेती आधारित व्यवसाय करणाऱ्या ४ हजार ४६० महिला आहेत. मानव विकास कार्यक्रमात पातूर तालुक्यात नवतेजस्विनी तयार कपडे प्रशिक्षण केंद्र सुरू असून, १६ बचत गटांना ई–रिक्षासाठी मदत करण्यात आली आहे. त्याचप्रमाणे, १ हजार २२७ महिलांना व्यवसायासाठी २ कोटी ६१ लक्ष रु. व तेजश्री मानव विकास मिशन कार्यक्रमात १ हजार ३११ महिलांना १ कोटी ३१ कोटी रु. देण्यात आले आहेत. लोकसंचालित साधन केंद्रातर्फे स्वबळावर सुसज्ज दोनमजली इमारतही अकोल्यात निर्माण करण्यात आली आहे. शेळीपालन, कुक्कुटपालन, दुग्धव्यवसाय, शेती पूरक व्यवसाय , किराणा, विविध वस्तू भांडार आदी व्यवसाय करण्यास गरजू महिलांना सहाय्य करून त्यांच्या सक्षमीकरणाचे कार्य होत आहे.

> ■ वर्धापनदिनानिमित्त 'माविम'तर्फे मलकापूर रस्त्यावरील लोभाजी आप्पाभवन येथे उद्या दि. २५ फेब्रुवारी रोजी दु. १२ वा. मान्यवरांच्या उपस्थितीत सुवर्णमहोत्सवी सोहळा आयोजिण्यात आला आहे, असे श्रीमती खोब्रागडे यांनी सांगितले.

# मनपाच्या बजेटमध्ये महसुली खर्चात करणार कपात : कलंत्रे

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२५अमरावती** – मार्च महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यात महापालिकेचे बजेट सादर होणार असून, यात महसुली उत्पन्न कमी असल्यामुळे महसुली खर्च पर्यायाने विकास कामांच्या खर्चात काही प्रमाणात कपात केली जाईल. तसेच शासनाकडून येणाऱ्या निधीद्वारे भांडवली खर्च वाढवला जाणार असल्याची माहिती मनपा आयुक्त सचिन कलंत्रे यांनी दिली. मागील काही वर्षांचा विचार करता मालमत्ता कर हेच मनपाच्या उत्पन्नाचे मुख्य स्रोत असून विविध कारणांमुळे कराची वसुली करणे हे मोठे आव्हान राहिले आहे. यंदा प्रथमच जप्तीच्या कारवाया सुरू झाल्यामुळे मागील काही वर्षांच्या तुलनेत समाधानकारक वसुली होत असली तरी मनपाचा एकूण खर्च बघता ती पुरेशी नाही. यासोबतच बाजार परवाना, एडीटीपीद्वारे जे उत्पन्न मिळते, अशा मनपाच्या स्वमिळकतीतून होणारी प्राप्ती ही महसुली उत्पन्न असून या मर्यादित महसुली उत्पन्नातून खर्चही मर्यादितच करावा लागणार आहे. त्याशिवाय मनपापुढे पर्याय नाही. जेथे आवश्यक आहे, तेथेच पैसा खर्च करावा लागणार आहे. त्यामुळे शहरातील काही विकास कामांमध्ये कपात होण्याची दाट शक्यता असल्याचे संकेतही मनपा प्रशासनाने दिले आहेत. शासनाकडून जो निधी येईल, त्या निधीद्वारे भांडवली खर्चात वाढ करावी लागणार आहे. विकास कामांसाठी येणारा संपूर्ण निधी खर्च केला जाईल. त्यामुळे साहजिकच भांडवली खर्च वाढणार आहे. यातूनच काही रखडलेली विकास कामेही पूर्ण केली जातील, असेही प्रशासनाने सांगितले.



# मुख्य पिकासोबत तसेच बांधावर कडधान्यांची लागवड कमवून देईल अधिकची रोकड

**दि.२५विदर्भ प्रजासत्ताक** – आज बाजारात कडधान्यांच्या किमती प्रचंड वाढल्या आहेत. शेतमालाला भाव न मिळणाऱ्या शेतकऱ्यांनी मुख्य पिकासोबत कडधान्यांची लागवड केली तर आर्थिक फायदा आहे.

शाळेतले शिक्षकही मोडाची कडधान्ये खा, असे आम्हा विद्यार्थ्यांना सारखं सांगायचे. शरीराची वाढ होण्यासाठी, झीज भरून काढण्यासाठी, कडधान्ये आहारात असावी हे खूप वेळा ऐकले होते.

कडधान्यांमध्ये भरपूर प्रमाणात प्रथिने असतात म्हणून कडधान्यांचे मला विशेष महत्त्व वाटायचे. हे महत्त्व काही दिवसांपूर्वी पुन्हा एकदा ठळक झाले ते नुकत्याच झालेल्या जागतिक कडधान्य दिवसामुळे. १० फेब्रुवारी रोजी 'जागतिक कडधान्य दिन' साजरा झाला आणि या आठवणींना उजाळा मिळाला.हल्ली सधन वर्गाच्या डाएट फूडमध्ये किंवा जीमचा परिणाम दिसावा यासाठी सप्लिमेंट फूडमध्ये खाल्ल्या जाणाऱ्या पदार्थांच्या यादीत प्रोटीन बार, प्रोटीन शेक हे पदार्थ लोकप्रिय झालेले दिसतात.नेहमीच्या जेवणाच्या ऐवजी हे पदार्थ खाण्याचे प्रमाण वाढताना दिसत आहे. यामध्ये चूक काय, बरोबर काय याबद्दल मी बोलत नाही. परंतु, आजच्या धावपळीमध्ये आणि बदललेल्या आहार सवयीमध्ये कडधान्यांना मोड आणून खाण्याचे प्रमाण कमी झालेले दिसते आहे.

तुम्हाला माहीत आहे का, की ही कडधान्ये जशी मानवी शरीराला गरजेची आहेत, तशीच ती जमिनीलाही उपयोगी आणि गरजेची आहेत. विविध हंगामामध्ये शेतकरी कडधान्यांची लागवड करतात.









शेतीच्या बांधावर, कडेला काही कडधान्यांची लागवड होते. शेतातील गहू, ज्वारी, बाजरी, तांदूळ सोबत बांधाला तूर, वाल यांची लागवड केली जाते. खरीप हंगामातील पिकांची, पावसाळा संपल्यानंतर कापणी होते.कापणीनंतर शेतजमिनीमध्ये असलेल्या ओलाव्याचा उपयोग करून चणे, मूग, वाल, उडीद पेरले जाते. जमिनीतील ओलाव्यावर ते रुजतात आणि हिवाळ्यात पडणाऱ्या दवावर त्यांची वाढ होते. त्यामुळेच दवावर वाढणारी पिके अशीही कडधान्यांची ओळख आहे.कडधान्यांच्या झाडांच्या पानांमधून बाष्पीभवन कमी प्रमाणात होते, त्यामुळे सिंचनाची सोय नसलेल्या शेतामध्ये कडधान्यांचे पीक घेता येते. शेतावर लावलेली ही कडधान्ये शेतजमिनींची काळजी घेत शेतीला सुपीक करत असतात.कडधान्यांच्या मुळांशी असलेल्या गाठीमध्ये 'रायझोबियम' हे जीवाणू राहतात. हे जीवाणू हवेतील नायट्रोजनचे जमिनीमध्ये नत्राच्या स्वरूपामध्ये स्थिरीकरण करून शेतजमिनीची नत्राची गरज पूर्ण करतात.कडधान्यांच्या झाडांच्या पानांमध्येही मोठ्या प्रमाणात नत्र असते. कडधान्यांचे पीक काढल्यानंतर या झाडांचे जमिनीत वेळाने विघटन होते. त्यातील नत्र जमिनीला मिळाल्याने जमीन कसदार होते.


आज बाजारात कडधान्यांच्या किमती प्रचंड वाढल्या आहेत. शेतमालाला भाव न मिळणाऱ्या शेतकऱ्यांनी मुख्य पिकासोबत कडधान्यांची लागवड केली तर आर्थिक फायदा आहे. एकूणच कडधान्ये ही माणसाच्या पोषणासाठी, सकस शेतजमिनीसाठी आणि शेतकऱ्यांच्या अर्थकारणासाठी खूप महत्त्वाची ठरतात.

आज जेवणाच्या डब्यामध्ये काय आणले आहे? शाळेत असताना जेवणाची मधली सुटी झाली की मैत्रिणींमध्ये डब्यामध्ये आपली आवडती भाजी आहे की नाही हे समजून घेण्याची घाई असायची. बहुतेक वेळा डब्यातली भाजी म्हणजे मोड आलेली कडधान्ये असायची.

**– श्रुतिका शितोळे**
**पर्यावरण अभ्यासक**












# रक्तशर्करा आणि डोळ्यांच्या व्याधी

**दि.२५विदर्भ प्रजासत्ताक**


बदलत्या जीवनशैलीमुळे लोकांच्या शारीरिक हालचाली कमी झाल्या आहेत. यामुळे लोकांना उच्च रक्तदाब आणि मधुमेहाची समस्या असणे सामान्य बनत चालले आहे. शहरी वातावरणात मधुमेहाची समस्या झपाट्याने वाढत आहे. मधुमेहामुळे शरीराच्या जवळपास सर्वच अवयवांवर परिणाम होतो.

भवतालचे जग पाहण्यासाठी निसर्गाकडून मिळालेले वरदान म्हणजे डोळे; पण दुर्दैवाने मधुमेहामुळे डोळ्यांवरही अत्यंत प्रतिकूल परिणाम होतो. भारतात मधुमेहजन्य दृष्टिदोष हे प्रतिबंधात्मक आंधळेपणाचे प्रमुख कारण बनले असून, यामुळे उत्पादकता, जीवनमान आणि आरोग्य खर्चावर परिणाम होत आहे. हाय शुगरमुळे रक्तवाहिन्यांमध्ये इजा होऊन डोळ्यांच्या रेटिना (डोळ्याच्या आंतरिक भागातील एक महत्त्वाचा भाग) आणि इतर भागांमध्ये सूज येते. यामुळे गंभीर नेत्रविकारांचा सामना करावा लागू शकतो.

मधुमेहामुळे होणारे डोळ्यांचे विकार

डायबेटिक रेटिनोपॅथी : मधुमेहामुळे होणार्या प्रमुख डोळ्याच्या विकारांपैकी एक म्हणजे डायबेटिक रेटिनोपॅथी. ह्या विकारात रेटिनाच्या रक्तवाहिन्यांमध्ये सूज येते, ज्यामुळे दृष्टीवर गंभीर प्रभाव पडतो. धूसर दृष्टी, लहान ठिपके दिसणे, रात्री दृष्टी कमी होणे, ही याची प्रारंभिक लक्षणे आहेत.

डायबेटिक कॅटरॅक्ट : मधुमेह असलेल्या व्यक्तींना कमी वयात मोतीबिंदू होण्याचा धोका जास्त असतो. यावर शस्त्रक्रियेचा मार्ग असला तरी शरीरातील उच्च रक्तातील साखरेची पातळी जखमा बरे होण्यास उशीर करू शकते. तसेच संसर्गाची शक्यता वाढवू शकते. यामुळे मधुमेहींवर शस्त्रक्रिया करणे, हे तसे गुंतागुंतीचे असते. सामान्यतः, मोतीबिंदूच्या शस्त्रक्रियेच्या सुमारे दहा दिवस आधी रुग्णाला आयड्रॉप्स घालण्यासाठी देतात. शस्त्रक्रियेपूर्वी रिकाम्या पोटी राहण्याचा सल्ला दिला जातो. त्यामुळे रक्तातील साखरेची पातळी स्थिर राहते. अलीकडील काळात नव्या तंत्रज्ञानामुळे आणि वैद्यकीय क्षेत्रातील प्रगतीमुळे अशा शस्त्रक्रियांमधील जोखीम कमी झाली आहे; परंतु अनेक रुग्ण शस्त्रक्रिया झाल्यानंतरची काळजी



घेण्यात कुचराई करतात. वास्तविक, शस्त्रक्रियेनंतर रुग्णांनी डॉक्टरांनी सांगितलेली औषधे वेळेवर घ्यायलाच हवीत. असे केल्याने इन्फेक्शन आणि सूज येण्याची समस्या कमी होते. तसेच शस्त्रक्रियेनंतर नियमित तपासणी आवश्यक असते.

ग्लॉकोमा : ग्लॉकोमा किंवा काचबिंदू हा डोळ्याचा गंभीर विकार आहे. अनेकांना आपल्याला काचबिंदू आहे, हे माहितीच नसते. निदानच झाले नाही आणि त्यामुळे त्यावर काही उपचारच झाले नाही, तर यामुळे अंधत्व येऊ शकते. काचबिंदूची शक्यता दर्शविणारा एक महत्त्वाचा धोकादायक घटक म्हणजे डोळ्याच्या आतल्या पाण्याचा वाढलेला दाब. निरोगी डोळ्यात डोळ्याचे अंतर्गत पाणी किंवा द्रव डोळ्यातून बाहेर निघून जाते म्हणजेच त्याचा निचरा होतो. ही निचरा करणारी यंत्रणा तुंबली आणि आवश्यक त्या नेत्ररसाचा निचरा सर्वसाधारण गतीने झाला नाही तर डोळ्याच्या आतला दाब वाढतो. दीर्घकाम दुर्लक्ष झाल्यास दृष्टीसुद्धा जाऊ शकते. घरात कुणाला काचबिंदू असेल, मधुमेह, उच्च रक्तदाब हे विकार असतील, तर डोळ्यांची नियमित तपासणी करावी. वर्षातून एकदा केलेल्या चाचणीतून काचबिंदूची लक्षणे आढळून आली तर त्यावर नियंत्रण मिळविता येते.

# कापूस व सोयाबीन उत्पादक शेतक–यांना अर्थसहाय्य आधार संमती सादर करण्याची मुदत २८ फेब्रुवारीपर्यंत

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२५अकोला–** : सन २०२३ खरीप हंगामातील कापूस व सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना २ हेक्टर मर्यादेत प्रति हे. ५ हजार रू. मदत देण्यात येत आहे. पात्र शेतक–यांनी आधार संमतीसह नाहरकत प्रमाणपत्र २८ फेब्रुवारीपूर्वी कृषी सहायकाकडे सादर करण्याचे आवाहन जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी शंकर किरवे यांनी केले.

खरीप २०२३ मध्ये ई–पीक पाहणी केलेले कापूस, सोयाबीन उत्पादक शेतकरी, ज्या शेतकऱ्यांनी ई–पीक पाहणी पोर्टलवर नोंद केली नाही तथापि, सातबारा उताऱ्यावर पीकाची नोंद आहे असे खातेदार, खरीप २०२३ कापूस, सोयाबीन उत्पादक वैयक्तिक व सामाईक खातेदार पात्र आहेत. पात्र शेतक–यांनी ई–पीक पाहणी पोर्टलवरील यादीत आपले नाव असल्याबाबत खातरजमा www.scagridbt.mahait.org या पोर्टलवर किंवा संबधित कृषी सहाय्यक यांच्याकडून करुन घ्यावी, तसेच ज्या शेतकऱ्यांनी खरीप २०२३ मध्ये ई– पीक पाहणी पोर्टलवर नोंद केली नाही तथापि, सातबा–यावर नोंद आहे अशा शेतकऱ्यांनी गावातील तलाठी यांच्याशी संपर्क साधावा. वनपट्टेधारक खातेदार असतील तर त्यांनी तहसील, जिल्हाधिकारी कार्यालयाशी संपर्क साधावा.



अर्थसहाय्य योजनेचा लाभ घेण्यासाठी वैयक्तिक खातेदारांना आपले आधार संमती व सामाईक खातेदारांना आधार संमतीसह नाहरकत प्रमाणपत्र २८ फेब्रुवारीपर्यंत संबधित कृषी सहाय्यक यांचेकडे सादर करणे आवश्यक आहे. त्याचे नमुने कृषी सहायकांकडे उपलब्ध आहेत.

RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

# विदर्भ प्रजासत्ताक

मंगळवार दि. २५ फेब्रुवारी २०२५ | शहर/ग्रामिण


# खारतळेगाव अळनगाव रोडवर युवकाचा संशयास्पद मृत्यू

## वलगाव पोलीस ठाणे हद्दीतील धक्कादायक घटना

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२५ भातकुली** – भातकुली तालुक्यातील वलगाव पोलीस ठाणे हद्दीतील अळनगाव येथील प्रफुल संजय नवले वय ३० हा दिनांक २३ रविवार रोजी दुपारी एक वाजता त्याच्या दुचाकीने यम एच २७ सी एल ३०९१ ने त्याच्या आईला बहिणीकडे धामोरी येथे सोडून देण्याकरिता गेला होता मात्र तिथुन त्याच्या मुळ गावी अळनगाव येथे दुचाकी घेऊन परत येत असताना खारतळेगाव अळनगाव रोडवर प्रफुल संजय नवले हा खारतळेगाव येथील शेतमजूर महिलांना मृत अवस्थेत पडून दिसला महिलांनी तात्काळ खारतळेगाव व अळनगाव येथील नागरिकांना माहिती दिली नागरिकांनी तात्काळ मृतकाची ओळख पटविली व मृतकाच्या घरच्या लोकांना व वलगाव पोलिसांना घटनेची माहिती दिली वलगाव पोलीस तात्काळ घटनास्थळी पोहोचले व पंचनामा केला मृतकाला जिल्हा सामान्य रुग्णालय येथे शवविच्छेदनासाठी दाखल करण्यात आले आहे व मृतकाची दुचाकी वलगाव पोलीस ठाणे येथे ठेवण्यात आली आहे अमरावती जिल्हा सामान्य रुग्णालयात मृतकाच्या नातेवाईकांनी व मित्रांनी जेव्हा मृतकाच्या अंगावरचे कपडे काढण्यात आले तेव्हा मृतकाच्या डोक्याच्या मागच्या बाजूला गंभीर मार लागलेला होता उजवा हात तुटलेला होता डावा पाय देखील तुटलेला होता मृतकाच्या प्रायव्हेट पार्टवर मोठी जखम



देखील आढळून आली आहे सोबतच डाव्या पायाची मांडी सुजलेल्या अवस्थेत होती छातीवर जळलेल्याचे चटके दिसुन आले आहे गंभीर बाब म्हणजे अशी मृतकाच्या शरीरावरचे कपडे देखील फाटलेले नाही दुचाकीला देखील कुठली दुखापत झाली नाही असे दिसुन येत आहे प्रथमदर्शनी सांगतात की जेव्हा मृतक पडला होता तेव्हा त्याच्या हातात गाडीची चाबी होती मृतकाच्या पायात दोन्ही चपला तशाच होत्या मृतकाच्या अंगावर मोठ्या प्रमाणात कचरा पडला होता व त्याची दुचाकी देखील त्याच्या अंगावर ठेवली होती या संपुर्ण घटना मृतकासोबत घडल्या आहे अशी लेखी तक्रार देखील मृतकाच्या भावाने वलगाव पोलिसांना दिली आहे नेमकं शवविच्छेदन अहवालातुन काय समोर येते हे पाहणं महत्त्वाचं ठरणार आहे या संपूर्ण घटनेची निपक्ष व पारदर्शक पद्धतीने वलगाव पोलीस तपास करणार का हे पाहणं महत्त्वाचं ठरणार आहे.

# पोलिसांच्या अमानुष मारहाणीची दखल

## शीतली थापा यांना २ लाख नुकसान भरपाई

### मानवधिकार आयोगाचे आदेश



पोलिस आयुक्त नवीन चंद्र रेड्डी यांनी

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२५अमरावती–** चोरीच्या खोट्या आरोपात नेपाळची अमरावतीत राहणाऱ्या शीतली थापा यांना पोलिसांनी अमानुष मारहाण केली होती. या प्रकरणी थापा यांनी मानवाधिकार आयोगाकडे धाव घेतली असता त्यांना २ लाख रुपये नुकसान भरपाई देण्याचे आदेश गाडगे नगर पोलिसांना दिले आहे. मानवाधिकार आयोगाच्या आदेशानंतर २ लाखांची नुकसान भरपाई देण्यात येणार आहे. सीपी नवीनचंद्र रेड्डी यांच्या पाठपुराव्यामुळे शीतल थापा यांनादिलासा मिळाला आहे.न्याय मिळण्यासाठी वेळ लागतो, याची पुनरावृत्ती पुन्हा आली. अमरावतीमध्येही अशीच एक घटना घडली. शितली थापा नावांच्या एका नेपाळी महिलेवर घरकाम करताना चोरीचा खोटा आरोप लावण्यात आला. घरमालकाने थेट पोलिसांना कळवले आणि गाडगे नगर पोलिसांनी कोणतीही चौकशी न करता थर्ड डिग्री टॉर्चर वापरून क्रूरपणे मारहाण करण्यात आली. ही घटना उघडकीस आल्यानंतर त्याची गांभीर्याने दखल घेण्यात आली.

तात्काळ चौकशीचे आदेश दिले. तपासानंतर, गाडगे नगर पोलिसांनी गैरवर्तन केल्याचे स्पष्ट होताच, संबंधित पोलिसांवर कारवाई करण्यात आली. पोलिस निरीक्षकांना मुख्यालयाशी

जोडण्यात आले आणि त्यांच्यावर मारहाण करणाऱ्या पोलिसांना निलंबित करण्यात आले. मानवाधिकार आयोगाने हे प्रकरण गांभीर्याने घेतले आणि शितली थापा यांना २ लाख रुपये भरपाई देण्याचे आदेश दिले. पण त्याचे बँक खाते नसल्याने पोलिसांनी ही रक्कम थेट देण्याचा निर्णय घेतला आहे. पोलीस आयुक्त नवीन चंद्र रेड्डी २ ते ३ दिवसांत भरपाई देतील. या संपूर्ण घटनेमुळे शितली थापा आणि तिच्या पतीच्या चेहऱ्यावर समाधानाचे भाव दिसून येत आहे. पोलिस आयुक्त नवीनचंद्र रेड्डी यांनी दाखवलेल्या तत्परतेमुळे आणि प्रकरणाच्या गांभीर्यामुळे कारवाई जलदगतीने पूर्ण झाली.

# हिंमत असेल तर नीलम गोऱ्हेंनी उद्धव ठाकरेंवर गुन्हा दाखल करावा: बच्चू कडू

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२५अमरावती** प्रहार संघटनेचे नेते तथा माजी आमदार बच्चू कडू यांनीही या वादात उडी घेतली. हिंमत असेल तर नीलम गो-हेंनी उद्धव ठाकरेंवर गुन्हा दाखल करावा,



असं बच्चू कडू यांनी माध्यमांशी बोलताना म्हटलं आहे. शिवसेना शिंदे गटाच्या नेत्या नीलम गो-हे यांनी जर उद्धव ठाकरे यांना मर्सिडीज गाड्या दिल्या असतील तर कोणत्या क्रमांकाच्या दिल्या ते त्यांनी सांगितलं पाहिजे. खरं तर नीलम गो-हे यांच्याकडून आम्हाला या अपेक्षा नाहीत. त्या उद्धव ठाकरे यांच्याबाबत बोलल्या म्हणून मी बोलत



नाही. मात्र, कोणत्याही नेत्यांना कोणत्याही नेत्यांच्या विरोधात बोलायचं असेल तर काही संदर्भ किंवा काही पुरावे दिले पाहिजेत. पण कोणतेही पुरावे न देता आपण बोलत असू तर ते योग्य नाही, असं कडू यांनी म्हटलं आहे. तसेच जर नीलम गो-हे यांनी जर उद्धव ठाकरे यांना गाडी दिली असेल तर कोणती गाडी दिली ते सांगावं. गुन्हे दाखल करावेत. नीलम गोऱ्हे यांच्यात हिंमत असेल तर त्यांनी उद्धव ठाकरेंवर गुन्हा दाखल केला पाहिजे. नीलम गो-हे या उपसभापती आहेत. त्यांनी असे बिनबुडाचे आरोप करू नयेत. मात्र, जर खरंच उद्धव ठाकरे यांनी गाड्या घेतल्या असतील तर नीलम गोऱ्हे यांनी रणरागिणी सारखं मोर आलं पाहिजे, असं बच्चू कडू यांनी प्रसार माध्यमासोबत बोलतांना म्हटलं आहे.


# बोगस पीएचडी पदव्यांची तपासणी होणार

## विद्यापीठ अनुदान आयोग सचिवांचे पत्र

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२५अमरावती** – राजस्थान येथील जगदीशप्रसाद झाबरमल टिब्रेवाला विद्यापीठातून (जेजेटीयू) पीएच.डी. मिळविणाऱ्यांची तपासणी केली जाणार आहे. त्याअनुषंगाने केंद्रीय अनुदान आयोगाचे सचिव मनीष जोशी यांनी १२ फेब्रुवारी २०२५ रोजी एका पत्राद्वारे देशभरातील विद्यापीठांच्या कुलगुरूंना अशा बोगस पीएच.डी. तपासणी करण्याचे निर्देश दिले आहेत. त्यामुळे बोगस पीएच.डी पदवीधारक किती महाशय आहेत, हे लवकरच स्पष्ट होणार आहे.

विद्यापीठांच्या प्रत्येक कृतीवर यूजीसीचे नियंत्रण असते. तथापि, राजस्थान येथील जगदीशप्रसाद झाबरमल टिब्रेवाला विद्यापीठाने बोगस पीएच.डी. पदवी दिल्याचे दिसून आले. त्यामुळे




यूजीसीच्या स्थायी समितीने जेजेटीयूद्वारे सादर केलेली माहिती, डेटा विश्लेषण, तपासणी आणि मूल्यांकनानुसार पीएच.डी.च्या तरतुदीचे पालन झाले नाही, असा ठपका ठेवला आहे. पीएच.डी.च्या पुरस्कारासाठीचे नियम आणि शैक्षणिक मापदंडाला छेद दिला. तसेच यूजीसी पीएच.डी.च्या तरतुदींचे पालन करण्यात जेजेटीयू का अपयशी ठरले ? हे स्पष्ट करण्याची संधी देण्यात आली होती. तथापि, जेजेटीयूने फारसा प्रतिसाद दिला नाही, असे यूजीसीने पत्रात नमूद केले आहे. त्यामुळे यूजीसीच्या स्थायी समितीने या बोगस पीएच. डी. प्रकरणी कठोर पावले उचलली आहेत.

# सालबर्डी,कोंडेश्वर करीता ९५० पेक्षा अधिक बस फेऱ्यांचे नियोजन

## अमरावती, मोर्शी, बडनेरासह ८ डेपोतून गाड्या सुटणार, यात्रेकरूंच्या सुविधांकरिता एसटी प्रशासन सज्ज

## २३ फेब्रुवारी ते २ मार्च दरम्यान बसेस धावणार

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२५अमरावती–** महाशिवरात्री निमित्य जिल्ह्यातील सालबर्डी व कोंडेश्वर येथे भक्तांची गर्दी पाहता एसटी महामंडळाच्या वतीने त्यांना सुविधा देण्याकरिता अतिरिक्त बसेस सोडण्याचे नियोजन केले आहे. २३ फेब्रुवारी ते २ मार्च दरम्यान आठही आगारातून सुमारे ९५० च्या वर बस फेऱ्या या





तिर्थस्थानी सोडण्याला सुरुवात झाली आहे. २०२५ मध्ये ९६० पेक्षा जास्त फेऱ्या तसेच ३२ लाखापेक्षा उत्पन्न मिळविण्याचे उद्दिष्ट आहे.

महाशिवरात्री निमित्य जिल्ह्यातील सालबर्डीला विदर्भातील हंजारो भाविक भक्तांचा जनसागर लोटतो. त्यामुळे तेथे जाण्याकरिता भक्तांना सुविधा नसल्याने त्यांची मोठ्या प्रमाणात गैरसोह होते. अशातच या भक्तांच्या सुविधांकरिता एसटी महामंडळाच्या वतीने सालबर्डी व कोंडेश्वर या दोन्ही ठिकाणी २३ फेब्रुवारी ते २ मार्च दरम्यान आठही आगारातून जादा बसेस सोडण्यात येत आहे.आठही बसस्थानकांवर १० बसेसे उपलब्ध असणार आहे.

भक्तांची संख्या पाहून सदर बसेस सोडल्या जातील. मागील वर्षी सालबर्डी यात्रेकरिता ८७३ फेऱ्या सोडण्यात आल्या होत्या. यापोटी एसटी महामंडळाचे २२ लाख रूपयांचे उत्पन्न झाले होते. यंदा ९५० हून अधिक फेऱ्या सालबर्डी आणि कोंडेश्वर येथे सोडण्यात येणार असून यंदा सुमारे ३२ लाखांच्या उत्पन्नाचे उद्दिष्ठ महामंडळाकडून ठरविण्यात आले आहे. सोमवारला ११ फेऱ्यांची वाहतूक झाली असून त्याव्दारे २७० प्रवाश्यांनी बस सेवेचा लाभ घेतला.

### असे राहतील बसचे दर

अमरावती सालबर्डी १२२ रूपये
मोर्शी सालबर्डी दापोरी मार्ग २६ रूपये
मोर्शी सालबर्डी पाळा मार्ग २१ रूपये
चांदूर बाजार सालबर्डी मोर्शी दोपोरी मार्ग ८१ रूपये
परतवाडा सालबर्डी चांदूर, मोर्शी, दापोरी १३२ रूपये
वरूड सालबर्डी हिवरखेड मार्ग ५१ रूपये

### महिलांसह अन्य योजनेतील सवलती कायम

इतर प्रवासात महीलांना भाड्यात ५० टक्के सवलत, यासह जेष्ठव अमृत नागरीकांकरिता जी सवलत शासनाकडून दिली जात आहे. त्या सर्व सुविधांचा लाभयायात्रा महोत्सवाच्या प्रवासात दिल्या जाणार असल्याचे विभागीय वाहतूक अधिकारी योगेश ठाकरे यांनी सांगितले.

# राजराजेश्वर मंदिरातून बुधवारी निघणार शिवाची महावरात

## आजपासून शिव गौरा विवाह महोत्सवास प्रारंभ

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२५अकोला–** महाशिवरात्री पर्वावर शिवगौरा विवाह महोत्सव होत असून जिल्ह्यात प्रथमच शिवविवाहाची महावरात महाशिवरात्री बुधवारी, २६ फेब्रुवारीला सायंकाळी ४ वाजता राजराजेश्वर मंदिरापासून निघणार आहे.

यामध्ये भाविक विविध पेहराव केलेले शिवगण या महावरातील राहणार असून, ही महावरात महानगरातील रस्त्यावर भ्रमण करीत रिझर्व माता मंदिर येथे पोहोचून तेथे शिवविवाह सोहळा होणार आहे,

या महोत्सवाचा प्रारंभ मंगळवारी, २५ फेब्रुवारीला होत असून, या दिनी सायंकाळी ५.३० वाजता राजराजेश्वर



मंदिरात गणेश पूजन होऊन महोत्सवाचा प्रारंभ होईल.

यानंतर विवाहप्रसंगी करण्यात येणारे विधी करण्यात येऊन यात वराती मंडळींना हळद लावणे, मेहंदी रंगवणे यासह आदी कार्यक्रम होऊन रात्री भजन संध्या होणार आहे.

२६ फेब्रुवारी या महाशिवरात्री दिनी दुपारी ४ वाजता शिव विवाह सोहळ्याची महावरात राजेश्वर



मंदिरापासून निघून ती रिझर्व माता मंदिर येथे पोहोचून रात्री ८.३० वाजता रिझर्व माता मंदिर प्रांगणात शिवपार्वती विवाह सोहळा शिवभक्तांच्या साक्षीने होणार असल्याचे यावेळी सांगण्यात आले. या विवाह प्रसंगी अनेक कार्यक्रम होणार आहेत. उत्सवाचे समापन २७ फेब्रुवारीला शिव गौरा विवाहाच्या निमित्त आयोजित महाप्रसादाने होणार असून, या महाविवाहाच्या महाप्रसादाचा लाभ अकोलेकर महिला पुरुष शिवभक्त घेणार असल्याचे यावेळी सांगण्यात आले.या सोहळ्यासाठी समितीच्या वतीने अनेक उपसमित्या गठीत केल्या आहेत.

# आमदार चषक फुटबॉल स्पर्धेत वर्धा डिएफए ला ३-२ ने ट्राय ब्रेकर मध्ये विजयी पदावर नाव कोरले

## इंडिपेंडन्ट अकेडमी व शोध प्रतिष्ठान अमरावती द्वारा आयोजित स्पर्धेचा समारोप

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२५अमरावती :** आमदार चषक राज्यस्तरीय फुटबॉल स्पर्धाच्या रोमांचक अंतिम सामन्यात अमरावती फुटबॉल क्लबने ट्रायबे्कर मध्ये वर्धा डीएफए संघाचा ३-२ अशा गोलने पराभव करून विजेते पदावर नाव कोरले, उभय संघ पुर्णवेळ आक्रमक खेळले,तरी गोल फरक ०-० ने रिकामी राहिला. परिणामी पंचांनी ट्रायबेकर मध्ये सामन्यांचा अंतिम निर्णय लावण्याचे निश्चित केले. शोध प्रतिष्ठानचे अध्यक्ष यश सुलभा संजय खोडके व अमरावती इंनडिपेंन्ट ॲकैडमी च्या संयुक्त विद्यमाने सायन्सकोर मैदानात आयोजित या स्पर्धेत जिल्हास्तरीय १६ संघ सहभागी झाले होते. १६ ही संघांनी स्पर्धेदरम्यान उत्तम कामगिरी केली. मात्र शनिवारी अमरावतीचे दोन संघ तसेच वर्धा व अकोला उपांत्य फेरीत धडक दिली दोन्ही उपांत्य सामन्यात अमरावतीचा संघ व वर्धा अमरावती व अकोला संघ विरुद्ध झुंज दिली. यात पहिली लढत वर्धा संघाने ने जिंकली तर दुसरी लढत अमरावती एएफसी संघाने जिंकून अंतिम फेरीत प्रवेश केला.रविवार दिनांक २३ फेब्रुवारी ला सायन्सकोर मैदानावर दुपारी ४.०० वाजता अंतिम सामन्याला सुरुवात झाली. एफसी अमरावती संघाने सुरुवातीला काही उत्तम



व्युहरचनाने आक्रमणे केली, परंतु वर्धा संघाच्या बचाव फळीने ती मोडीत काढली. त्याचवेळी संघाने मात्र त्यांचाही गोल झाला नाही . एफसी अमरावती संघाचा एक गोल थोडक्यात हुकला चेंडू गोल पोस्ट ला चाटून बाहेर गेला. निर्धारित वेळेत दोन्ही संघ गोल शून्य बरोबरीत राहिले, त्यामुळे टायब्रेकर मध्ये सामन्याचा निकाल लावला. यात एफसी अमरावती संघाने तीन तर वर्धा संघाने केवळ दोनच संधींना परिवर्तित केले. विजेता एफसी अमरावती संघाला ३१,००० रोख पुरस्कार व स्व.रोहित देशमुख स्मृति प्रित्यर्थ अजयराव देशमुख तर्फे चषक व व्दितीय पुरस्कार २१ हजार रुपये व चषक संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या फुटबॉल निवड समितीचे डॉ. सुनील डंबारे , जिल्हा क्रीडा अधिकारी गणेश जाधव, देवानंदजी म्हाला, प्रा. हनुमंत लुंगे (शिवछत्रपती पुरस्कार ) यांच्या हस्ते प्रदान करण्यात आले. याप्रसंगी महानगर शारीरिक शिक्षण संघटनेचे अजय आळशी, दिनेश देशमुख, संदीप इंगोले, संतोष अरोरा, संदेश गिरी, नितीन चवाळे (शिवछत्रपती पुरस्कार प्राप्त) इंडिपेंडेंट अकॅडमीचे अध्यक्ष बाळासाहेब सोलिव ,उपाध्यक्ष बाबू लालूवाले तसेच धीरज मिश्रा, सचिव दिनेश म्हाला, सहसचिव प्रभात चंद्र यादव तसेच अक्षय मांगुळकर व नयन वानखडे अँड.सदानंद जाधव सुमेध भिमटे , किरण महाजन,शुभम चवरे, अभिनव म्हाला, छोटू भाऊ दाभाडे, साहिल सोलीव, प्रीती भैसे, निखिल सोलिव आदी मान्यवर उपस्थित होते. या स्पर्धेमध्ये रुतिक आटकर बेस्ट गोल किपर वर्धा, बेस्ट डिफेंस जावेद अमरावती, बेस्ट स्ट्राईकर ऋषिकेश खंडारे, बेस्ट हाफ सौरभ चेके वर्धा, तसेच प्लेयर ऑफ द टूर्नामेंट तन्वीर लालुवाले इंडिपेंटेट ॲकेदमी अमरावती ,यांना ट्राफी देउन सम्मानित करण्यात आले. याप्रसंगी महानगर शारीरिक शिक्षण संघटनेचे अजय आळशी, दिनेश देशमुख, संदीप इंगोले, संतोष अरोरा, संदेश गिरी, नितीन चवाडे ,इंडिपेंडेंट अक्ॅडमीचे अध्यक्ष बाळासाहेब सोलिव उपाध्यक्ष बाबू लालूवाले तसेच धीरज मिश्रा सचिव दिनेश म्हाला, सहसचिव प्रभात चंद्र यादव आदी उपस्थित होते. तसेच यावेळी गौरी वसंत धोटे या महिला खेळाडूने ४ नॅशनल, ४ विदर्भ केसरी व महाराष्ट्र केसरी मध्ये व्दितीय क्रमांक तसेच ऑल इंडिया विद्यापीठ मध्ये टॉप १० मध्ये ७२ किलो वेटमध्ये उत्कृष्ठ प्रदर्शन केल्या बद्दल तिचाही सत्कार मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी सामनाधिकारी म्हणून अभिषेक सोनवणे (अहमदनगर) निर्णय पंच वेस्ट इंडिया असोसिएशन मुंबई कडून लाभलेले साकेत बाविस्कर साहिल बोसतकर (मुंबई) सौरभ गोरे (नागपूर) शेख रमिज, आशिष लोखंडे, निकेश गजभिये (अमरावती) यांनी जवाबदारी सांभाळली.

## फासेपारधी समाज बांधवांच्या विविध प्रकारच्या समस्या निकाली काढा, तहसिलदार कडे मागणी

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२५मंगरूळ चव्हाळा** मंगरूळ चव्हाळा येथील फासेपारधी समाज बांधवांच्या विविध प्रकारच्या समस्या आपल्या स्तरावरून सोडवण्याकरिता कार्यक्रमाचे किंवा मोहिमेचे आयोजन करून जातीचे प्रमाणपत्र, राशन कार्ड, रहिवासी दाखले, आधार कार्ड, मतदान कार्ड, आपल्या अधिकारी स्तरावरून उपलब्ध करून देणे करिता कू. अश्विनी जाधव मॅडम तहसीलदार कार्यालय नांदगाव खंडेश्वर जिल्हा अमरावती यांच्याकडे युवा एकीकरण सामाजिक समाज संघटनेचे (अध्यक्ष) उमेश पवार व पदाधिकारी किरण धोतरकर, शारदेश पवार, गजानन भोसले आणि आदिवासी फासेपारधी बहुउद्देशीय ग्रामीण लोक कल्याण संस्थेचे पदाधिकारी




(अध्यक्ष)रवेश भोसले, संदेश पवार, सुदेश पवार, शिवानंद भोसले, संतोष भोसले हे सर्व पदाधिकारी पारधी समाजाच्या विविध समस्या घेऊन नांदगाव खंडेश्वर तालुक्यातील संपूर्ण गावात असलेल्या फासेपारधी समाजाच्या विविध समस्या जसे जातीचे प्रमाणपत्र, राशन कार्ड, आधार कार्ड, महाराष्ट्र चे रहिवासी दाखले, आधार कार्ड, इलेक्शन कार्ड, याकरिता आपल्या स्तरावरून कार्यक्रमाचे किंवा विशेष मोहिमेचे आयोजन करून गावोगावी जाऊन तुमच्या समस्या आम्ही पूर्ण करू असे आश्वासन कु. अश्विनी जाधव मॅडम तहसीलदार कार्यालय नांदगाव खंडेश्वर यांनी दिले

## परिचारिकांचे आंदोलन 3 मार्च पर्यंत स्थगित

विदर्भ प्रजासत्ताक

**दि.२५अमरावती–** जिल्हा सामान्य रुग्णालयातील दोन महिला कर्मचाऱ्यांचे निलंबन मागे घेण्यासाठी सोमवारपासून सुरू होणारे परिचारिका संघटनेचे काम बंद आंदोलन ३ मार्चपर्यंत स्थगित केले आहे. आरोग्य उपसंचालक डॉ. कमलेश भंडारी आणि संघटनेचे पुढारी यांच्यात झालेल्या यशस्वी वाटाघाटीनंतर हा निर्णय घेण्यात आल्याचे महाराष्ट्र गव्हन्मेंट नर्सेस असोसिएशनच्या अध्यक्ष वर्षा पागोटे यांनी सांगितले.

अत्याचारपीडित एका अल्पवयीन मुलीवर उपचार करण्यात हयगय केल्याचा ठपका ठेवून भीम ब्रिगेडने जिल्हा सामान्य रुग्णालयात आंदोलन केले होते. पुढे या आंदोलनाची दखल घेत प्रशासनाने दोन परिचारिकांना तडकाफडकी निलंबित केले, परंतु हीकारवाई अयोग्य असून त्यात परिचारिकांचा दोष नाही, असे म्हणत दुसऱ्याच दिवशी परिचारिका संघटनेने काम बंद करून निलंबन मागे घेण्याची मागणी रेटली. या आंदोलनाचा पुढचा टप्पा सोमवारपासून सुरू होणार होता. दरम्यानच्या काळात आरोग्य उपसंचालक डॉ. भंडारी यांनी संघटनेच्या पुढाऱ्यांशी चर्चा करूनआठवडाभराचा अवधी मागितला. या प्रकरणाच्या चौकशीसाठी जिल्हा स्त्री रुग्णालयाचे अधीक्षक डॉ. विनोद पवार यांच्या नेतृत्वात पाच सदस्यीय समिती गठित केली आहे. या समितीची चौकशी प्रगतिपथावर आहे. त्यामुळे ती पूर्ण झाल्यावरच या प्रकरणाचा सोक्षमोक्ष लागेल. तोपर्यंत प्रशासनाला वेळ द्यावा, असे आरोग्य उपसंचालकांचे म्हणणे होते.

### चौकशी समितीसमोर येणार हे मुद्दे चर्चेसाठी

अत्याचार पीडित मुलीची तपासणी आणि उपचार करताना एक विशिष्ट संहिता पाळावी लागते. त्या मुलीला पोलिसांमार्फत रुग्णालयात दाखल केले जाते. तिचा उपचार वेगळ्या कक्षात करावा लागतो. तत्पूर्वी डॉक्टरांमार्फत निदान होणेही आवश्यक असते. परंतु त्या मुलीला रुग्णालयात दाखल करतानानातेवाईक व इतरांनी एकचगर्दी केली होती, पहिल्या दोन पायऱ्या टाळून थेट परिचारिकांनाच उपचार करण्यास बाध्य करण्याचा प्रयत्न केला होता, अशी काही प्रत्यक्षदर्शींची माहिती आहे. चौकशी समितीसमोर हे मुद्दे येणार असून संहिता पाळली गेली की नाही, हे स्पष्ट होणार आहे..

## डॉ नितीन धांडे भारतकॉन २०२५ पुरस्कारने सन्मानित

### राम गोपाल वर्मा यांच्या हस्ते पुरस्कार वितरण

विदर्भ प्रजासत्ताक

**दि.२५अमरावती** – विदर्भ युथ वेलफेअर सोसायटीचे अध्यक्ष डॉ नितीन धांडे यांना अमरावती मॅनेजमेंट असोसिएशन द्वारा भारतकॉन २०२५ पुरस्कार देऊन नुकतेच सन्मानित करण्यात आले आहे.हा पुरस्कार प्रसिद्ध सिने निर्देशक राम गोपाल वर्मा यांच्या हस्ते भव्यकार्यक्रमात वस्त्र उधोग मंत्रालय भारत सरकारच्या आयुक्त रूप राशी , सियारामचे एमडी पवन पोतदार, रेमंड लाईफ स्टाइल चे सिईओ अनुपमा दिक्षित, अमरावती मॅनेजमेंट असोसिएशनचे अध्यक्ष रणजित बंड, सचिव प्रीती डागा व सी ए मयूर झंवर यांच्या उपस्थितीत प्रदान करण्यात आला.डॉ नितीन धांडे यांनी केलेल्या सामाजिक व शैक्षणिक कार्याची दखल घेत त्यांना हा मानाचा पुरस्कार प्रदान करण्यात आला.मिळालेल्या पुरस्कारमुळे आणखीण जबवाबदारीत वाढ झाली असून ही माझ्यासाठी अभिमानाची गोष्ट आहे असे मत डॉ नितीन धांडे यांनी व्यक्त केले.डॉ नितीन धांडे यांच्या मार्गदर्शनात ४० हजारविद्यार्थी शिक्षण घेतातत्तसेच ३ हजार कर्मचारी आपली सेवा देतात,शैक्षणिक व सामाजिक कार्यासाठी शौर्य प्रतिष्ठान यांच्या तर्फे पानिपत येथे महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्या हस्ते त्यांचा शौर्य सन्मान पुरस्कार देऊन नुकताच सन्मान करण्यात आला आहेभारताचे राष्ट्रपती मिसाईल मॅन ए पी जे अब्दुल कलाम यांना गुरुस्थानी



ठेऊन त्यांची भेट घेऊन व चर्चा करून २०१४ साली त्यांनी सेंट्रल इंडियन रिसर्च फॉउंडेशनची स्थानपा केली व संशोधनासाठी व्यासपीठ उपलब्ध करून दिले,शिक्षण क्षेत्रात ए आय सी टी ई या सर्वोच्च संस्थेकडून भारत सरकार कडुन आंतरराष्टीय शिष्टमंडळात त्यांचा समावेश करण्यात आला होताआरोग्य सेवा देण्यासाठी त्यांनी ग्रामीण भागात मोठया प्रमाणात नेत्र तपासणी शिबिराचे आयोजन केले,व हजारो चष्यामांचे वाटप केले तसेच दंत तपासणी शिबीर आयोजित करून ग्रामीण क्षेत्रात मोट्या प्रमाणात आरोग्य सेवा दिल्याशेतकऱ्यासाठी माती परीक्षण प्रयोगशाळा काढल्या, याचा लाभ मोठया प्रमाणात शेतकऱ्यांना झाला आहे.त्यांचे शिक्षण क्षेत्रात अविरत सेवा देण्याचे काम सुरु असून भारत सरकार् कडुन संशोधनासाठी व स्टार्ट अप व रोजगारनिर्मिती साठी मोठया प्रमाणात काम केले आहेत्यांच्या या कार्याची दखल घेत अमरावती मॅनेजमेंट असोसिएशन द्वारा त्यांचा सत्कार करण्यात आला आहे.यावेळी मोठया प्रमाणात प्रेक्षक उपस्थित होते.त्यांच्या या यशाबद्दल विदर्भ युथ वेलफेअर सोसायटीचे उपाध्यक्ष ॲड. मा उदय देशमुख, कोषाध्यक्ष प्रा. डॉ. हेमंत देशमुख, सचिव युवराजसिंह चौधरी, कार्यकारिणी सदस्य मा नितीन हिवसे,डॉ. पूनमताई चौधरी, मा पकंज देशमुख, मा प्रा. विनय गोहाड आणि मा प्रा. गजानन काळे यांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

## ई – पिंक रिक्षासाठी केवळ २९३ महिला ठरल्यात पात्र

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२५अमरावती–** महिला सक्षमीकरण व आर्थिकदृष्ट्या आत्मनिर्भर व्हाव्यात, या संकल्पनेतून महिलांसाठी असलेल्या ई-पिंक रिक्षा योजनेस प्रतिसाद मिळत नसल्याचे चित्र आहे. अमरावती जिल्ह्यासाठी ६०० रिक्षांचे उद्दिष्ट असताना केवळ २९३ लाभार्थी महिलांचे अर्ज आले आहेत. उद्दिष्टपूर्ती कशी करावी, असा प्रश्न त्यामुळे महिला व बालविकास विभागासमोर उभा झाला आहे.

खास महिलांसाठी २०२४ मध्ये ई-पिंक रिक्षाची योजना राज्य सरकारने महिला व बालविकास विभागामार्फत लागू केली आहे. २.७८ लाख रुपये किमतीचा एक ई-पिंक रिक्षा लाभार्थ्याला एकूण रकमेच्या ७० टक्के कर्जावर उपलब्ध करून देण्यात येणार आहे. लाभार्थ्यानि स्वतःचा हिस्सा १० टक्के द्यायचा असून, २० टक्के रक्कम राज्य सरकार देणार आहे. लाभार्थ्यांना ८० हजार रुपयांची सबसिडी मिळणार आहे.जिल्ह्यासाठी ६०० रिक्षांचे उद्दिष्ट देण्यात आले असून, त्यामध्ये अमरावती शहरासाठी ३०० व ग्रामीण शहरी भागासाठी ३००, अशी उद्दिष्टांची विभागणी करण्यात आली आहे.



वर्षभरापूर्वी लागू झालेल्या या योजनेत आतापर्यंत जिल्ह्यातून २९३ लाभार्थ्यांचे अर्ज प्राप्त झाले असून, त्यास मंजुरी देण्यात आल्याचे महिला व बालविकास अधिकारी टेकाळे यांनी सांगितले. लाभार्थी महिलांना ७० टक्के कर्ज विविध बँकांकडून मिळवून देण्यासाठी उत्पादक कंपनी स्वतः प्रयत्न करणार आहे. या कंपनीची चमू येणार असून ती बँकांसोबत करार करून कर्ज उपलब्ध करून देतील. यासाठी महिला लाभार्थ्यांचे सिबिल तपासण्यात येणार आहे. या रिक्षा शहरातील कोणत्या मार्गावर चालवण्यात याव्यात, ते प्रादेशिक – परिवहन विभागाकडून निश्चित – करण्यात येणार आहे. ई-रिक्षांसाठी – चार्जिंग स्टेशन उभारण्यात येणार असले तरी त्यासाठी अद्याप जागेची निवड करण्यात आलेली नाही.

### लाभार्थ्यांची उदासीनता का?

विविध बँकांचे व्याजदर वेगवेगळे आहेत. ७० टक्के रकमेवर ते लागू होणार आहेत. याशिवाय यारिक्षातून केवळ तीन महिला प्रवासी वहन करता येणार आहे. १० अश्वशक्तीचे इंजिन असलेली ही ई-पिंक रिक्षा एकवेळ चार्ज केल्यानंतर ११० किमी धावू शकते. प्रवासी क्षमता, चार्जिंगसाठी लागणारे शुल्क व कर्जावरील व्याजाचादर, यामुळे लाभार्थी या योजनेसाठी समोर येत नसल्याचे वास्तव आहे.

## आकाशात पश्चिमेकडे घ्या शुक्राचे तेजस्वी दर्शन!

### २४ ते २६ फेब्रुवारीपर्यंत शुक्राची चांदणी सध्या आहे पृथ्वीच्या अगदी जवळ

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२५अकोला–** सद्य:स्थितीत सायंकाळी पश्चिम आकाशात सर्वांत तेजस्वी दिसणारी आणि आपली नजर न ढळू देणारी अतिशय चमकदार तारका लक्ष वेधून घेत आहे. पण ही चांदणी नाही तर शुक्र ग्रहाचे तेजस्वी रूप आहे, जे पश्चिम आकाशात अधिराज्य गाजवत आहे. सायंकाळी सात ते साडेसात या अर्ध्या तासाच्या कालावधीत पूर्ण ग्रह दर्शनास सज्ज आहेत. ही दुर्मिळ खगोलीय घटना येत्या २४,२५ आणि २६ फेब्रुवारीला याच वेळात अनुभवता येईल. दुर्बिणीतून तर शुक्र कला चतुर्थीच्या चंद्र कलेप्रमाणे दिसत आहे. याच क्षणी सूर्यमालेतील सर्वांत सुंदर व वललांकित असलेला शनी ग्रह आणि नुकताच उदित झालेला बुध ग्रह सोमवारी सायंकाळी




शुक्र ग्रहाचे खालील बाजूस युती स्वरूपात एकमेकांच्या जवळ असतील. खूप वर्षांनी कमी जागेत आलेल्या सर्व ग्रहांच्या मेळाव्यातील ही शेवटची भेट असेल. यानंतर दोन दिवसांनी शनी ग्रह सूर्य सान्निध्यात आल्याने शनी ग्रहाचा अस्त होईल. त्यामुळे आकाशप्रेमींनी या अनोख्या संधीचा लाभ घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.गुरुवारी २७ फेब्रुवारीला शनी ग्रहाचे अस्तानंतर शनी ग्रहाचे वलय सूर्य, पृथ्वी आणि शनी ग्रहाचे स्थिती बदलामुळे दुर्बिणीतून सर्व सामान्य माणसाला आकर्षित करणारे वलय अनेक दिवस विलुप्त होईल. शुक्रवारी २१ फेब्रुवारीपासून मंगळ ग्रह मेळाव्यात दाखल झालेला बुध ग्रह सध्या दुर्बिणीतून दशमीच्या चंद्र कलेप्रमाणे दिसत आहे. वसंत ऋतूच्या स्वागत उत्सवात खगोलप्रेमींनी सहभागी होऊन या अपूर्व अनुभूतीचा लाभ घ्यावा. अकोल्याच्या विश्वभारती केंद्राचे प्रमुख प्रभाकर दोड यांनी या अद्वितीय दर्शनाचे खगोलीय कारण स्पष्ट केले.

## महाराष्ट्र-एमपी सीमेवरील गावठी दारू अड्डे उद्धवस्त

### संयुक्त कारवाईत केला २७ लाखांचा मुद्देमाल नष्ट

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२५मोर्शी–** महाशिवरात्रीनिमित्त सालबर्डी येथे भरणाऱ्या यात्रेच्या अनुषंगाने खबरदारीची उपाययोजना म्हणून महाराष्ट्र-मध्य प्रदेश सीमेवरील नदीपात्रालगतच्या गावठी दारू अड्ड्यांवर धाड टाकून ते उद्धवस्त करण्यात आले. अमरावती ग्रामीणच्या स्थानिक गुन्हे शाखा व मध्य प्रदेश पोलिसांच्या वतीने ही संयुक्त कारवाई सोमवारी (दि. २४) करण्यात आली. या कारवाईत २७ लाख ९ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करून जागीच नष्ट करण्यात आला. महाशिवरात्री उत्सवानिमित्त मोर्शी ठाण्याची हद्द व मध्य प्रदेश सीमेवर असलेल्या सालबर्डी येथे यात्रा भरते. त्या अनुषंगाने स्थानिक गुन्हे शाखेचे पथक, मोर्शी ठाण्यातील डीबी पथक आणि मध्य प्रदेशातील मुलताई ठाण्यांतर्गत मासोद चौकी येथील पथकाने संयुक्तरीत्या सोमवारी सकाळी सीमेवरील घोडदेव, झुनकारी, पांढरघाटी व रोहणा शिवारातील नदीपात्रालगत उभारण्यात आलेल्या दहा गावठी दारू अड्यांवर धाड टाकून ते उद्धवस्त केले. या कारवाईत २०० लिटर क्षमतेचे ८३ प्लास्टिक ड्रममधील १६ हजार ६०० लिटर मोह सडवा, ७० लिटर क्षमतेच्या १५ ट्यूबमधील गावठी दारू, २०० लिटर क्षमतेचे ८३ प्लास्टिक ड्रम आणि सिमेंटच्या टाक्यामधील ८ हजार ५०० लिटर मोह सडवा असा एकूण २७ लाख ९ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करून जागीच नष्ट करण्यात आला. ही कारवाई स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक किरण वानखडे, पीएसआय सागर हटवार व त्यांचे पथक तसेच मोर्शी व मुलताई ठाण्यांतर्गत मासोद चौकी येथील कर्मचारी यांनी केली.

# मालमत्ता कर वसूलीसाठी मनपाची धडक जप्ती मोहिम

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२५ अमरावती**

कर संकलन व कर आकारणी विभाग अमरावती शहर महानगरपालिका यांच्या वतीने विविध सुट योजना देऊनही काही थकबाकीदार टॅक्स भरणा करण्यास टाळाटाळ करीत आहेत. त्यांच्यावर मनपा मार्फत धडक जप्ती मोहीम राबविण्यात येत आहे. त्यानुसार दि. २४ फेबुवारी रोजी महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रामध्ये मालमत्ता कराच्या वसूलीसाठी नियुक्त करण्यात आलेल्या वसूली पथकामार्फत कार्यवाही करण्यात आली आहे.सोमवार दिनांक २४/०२/२०२५ रोजी पाचही झोन अंतर्गत थकीत मालमत्ता धारकांवर मालमत्ते वर जप्ती संदर्भात



कार्यवाही केले असून उत्तर झोन क्र.१ रामपुरी कॅम्प मधील मालमत्ता कर वसुल रु.२१.९२ लाख, मध्य झोन क्र.२ राजापेठ मधील मालमत्ता कर वसुल रु.४३.०८ लाख, पुर्व झोन क्र.३ दस्तुरनगर मधील मालमत्ता कर वसुल रु.६२.५६ लाख, दक्षिण झोन क्र.४ बडनेरा मधील मालमत्ता कर वसुल रु.१७.९१ लाख, पश्चिम झोन क्र.५ भाजीबाजार मधील मालमत्ता कर वसुल रु.११.९५ लाख असे एकुण १.५७ कोटी मालमत्ता कर वसुल करण्यात आले.या पुढेही थकीत कराच्या वसूलीसाठी नियुक्त पथकामार्फत जप्तीची कार्यवाही तिव्र करण्यात येणार असून सदर कार्यवाही अंतर्गत मालमत्ता सील करणे, आटकाव करणे इत्यादी कार्यवाही करण्यात येणार असून मालमत्ता जप्त किंवा सील करून मुदतीमध्ये मालमत्ताधारकांनी कर भरणा न केल्यास अशा मालमत्ताधारकांच्या मालमत्तेचा लिलाव, विक्री करून कर वसूल करण्यात येणार आहे. तरी व्याज, शास्ती माफी योजनेचा लाभ घेऊन आपल्याकडे देय असलेल्या कराचा भरणा करावा व जप्तीसारखी कटू कार्यवाही टाळावी, असे आवाहन महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक सचिन कलंत्रे यांनी केले आहे.

# बँकांच्या चुकीने १२१ शेतकरी प्रोत्साहन अनुदानापासून वंचित

## अनुदानाकरिता शासनाकडे डीडीआरकडून प्रस्ताव : शेतकऱ्यांची मात्र पायपीट

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२५अमरावती**

महात्मा जोतिराव फुले शेतकरीकर्जमुक्ती योजनेच्या प्रोत्साहनपर लाभ योजना २०१९ अंतर्गत नियमित कर्ज भरणा करणाऱ्या शेतकऱ्यांना ५० हजारांचा लाभ दिल्या जातो. या योजनेपासून जिल्ह्यातील १२१ शेतकरी मात्र अद्यापही वंचित आहेत. बँकांच्या चुकीमुळे या शेतकऱ्यांना योजनेचा लाभ मिळाला नाही. त्यामुळे जिल्हा उपनिबंधक कार्यालयाकडून अशा वंचित शेतकऱ्यांची यादी शासनाकडे पाठविण्यात आली आहे. मात्र त्यांचे अनुदान प्राप्त न झाल्याने ते कार्यालयात पायपीट करीत आहेत.



महाविकास आघाडीची सत्ता स्थापन झाल्यानंतर सन २०१९ मध्ये महात्मा जोतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजनेअंतर्गत शेतकऱ्यांना कर्जमाफी देण्यात आली होती. परंतु, जे शेतकरी नियमित कर्ज भरणा करतात, ते मात्र यापासून वंचित असताना शासनाकडून याच योजनेअंतर्गत या शेतकऱ्यांना ५० हजार रुपयांचे अनुदान मंजूर करण्यात आले. या योजनेअंतर्गत ३२ हजार ६३१ शेतकऱ्यांनी प्रस्ताव दाखल केले होते. यामध्ये १८ हजार ९१८ शेतकरी पात्र ठरले. जिल्ह्यातील १८ हजार १२९ शेतकऱ्यांनी आधार लिंक केले तर ७७९ शेतकऱ्यांचे मात्र आधार प्रमाणिकरण पेंडिंग होते, त्यामुळे आधार प्रमाणिकरण करण्याकरिता निवडणुकीपुर्वी त्यांना संधी देत योजनेचा लाभ देखील देण्यात आला. या योजनेमध्ये शेतकऱ्यांना सन २०१७-१८, २०१८-१९ व २०१९-२० या तीन वर्षांपैकी कोणतेही सलग दोन वर्ष नियमित कर्जफेड करण्याची अट लादल्यात आली होती. ही अट पुर्ण केलेले १२१ अपात्र शेतकऱ्यांचाही यामध्ये समावेश होता. परंतु या शेतकऱ्यांची चुकीची माहीती बँकोकडून सादर करण्यात आली. या शेतकऱ्यांनी एकच वर्षाचे कर्जफेड केल्याचे सदर बँकांनी दाखविल्याने ते या योजनेतुन अपात्र ठरले आहेत. त्यामुळे सदर शेतकऱ्यांनी जिल्हा उपनिबंधकांकडे तक्रारी केल्यात. याबाबत चौकशी केली असताना बँकांनीच चुकीची माहिती सादर केल्याने त्यांना लाभापासून वंचित राहावे लागण्याचे वास्तव समोर आहे. यामध्ये सर्वाधिक राष्ट्रीयीकृत बँकांचा समावेश आहे. शेतकऱ्यांच्या तक्रारी वाढत असल्याने जिल्हा उपनिबंधक कार्यालयाकडून अशा १२१ शेतकऱ्यांची यादी तयार करून त्यांना अनुदान मिळण्याकरिता शासनाकडे प्रस्ताव पाठविला आहे. परंतु शासनाकडून अद्यापही याची प्रक्रिया पुर्ण करण्यात आली नाही. मात्र शेतकरी या कार्यालयात पायपीट करीत आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांना अनुदान केव्हा मिळणार असा प्रश्न उपस्थित होत आहे.

**बँकांवर कारवाई का नाही?**

बँकांच्या चुकीमुळे सदर शेतकरी अनुदानापासून वंचित राहिले आहेत. यामध्ये शेतकऱ्यांची काही चुक नसताना त्यांना या कार्यालयात हेलपाटे घ्यावे लागत आहे. त्यामुळे शासनाच्या या महत्वाकांक्षी योजनेमध्ये ज्या बँकांची चुका केल्यात अशा बँकांवर कारवाई होणे गरजेचे आहे. याची दखल जिल्हाधिकारी यांच्यासह पालकमंत्र्यांनी घेणे गरजेचे आहे.

# नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्पाच्या दुसऱ्या टप्प्यातून दर्यापूर तालुका वगळला; शेतकऱ्यांमध्ये तीव्र संताप

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२५दर्यापूर:**

महाराष्ट्र शासनाच्या नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प (फेज-२) मध्ये अमरावती जिल्ह्यातील काही तालुक्यांचा समावेश करण्यात आला असला, तरी दर्यापूर तालुक्याला वगळण्यात आले आहे, यामुळे येथील शेतकरी व कृषी तज्ज्ञांमध्ये मोठ्या प्रमाणात नाराजी पसरली आहे.खारपाणपट्टयाच्या समस्या दुर्लक्षितदर्यापूर तालुका हा प्रामुख्याने खारपाणपट्ट्यामध्ये येणारा क्षेत्र असून, येथे जमिनीचा पोत सुधारण्यासाठी विशेष प्रयत्नांची गरज आहे. या भागातील शेतकरी मातीचा क्षारता व जलव्यवस्थापनाच्या समस्यांमुळे सातत्याने अडचणीत असतात. त्यामुळे नानाजी देशमुख कृषि संजीवनी योजनेचा या तालुक्यात विशेष लाभ होऊ शकला असता. मात्र, शासनाने हा तालुका वगळल्याने येथील शेती विकासाबाबत अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत.दि. दर्यापूर तालुका सहकारी शेतकी खरेदी विक्री समितीचे विद्यमान संचालक प्रा.डॉ. सुशील गावंडे यांनी या निर्णयावर नाराजी व्यक्त केली आहे. त्यांच्या मते, दर्यापूर तालुका खारपाण पट्ट्यात येतो आणि येथील जमिनीच्या सुपीकतेसाठी व पाणलोट व्यवस्थापनासाठी हा प्रकल्प अत्यंत महत्त्वाचा होता. शासनाने या बाबीचा विचार करून तातडीने दर्यापूर तालुक्याचा या योजनेत समावेश करावा.शासनाकडून पुनर्विचाराची मागणीस्थानिक शेतकरी व कृषी तज्ज्ञांनी दर्यापूर तालुक्याचा नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्पात समावेश करण्याची मागणी केली आहे. शासनाने या निर्णयावर पुनर्विचार करून दर्यापूर तालुक्याला संजीवनी प्रकल्पाच्या दुसऱ्या टप्प्यात सामील करावे, अशी जोरदार मागणी होत आहे.



**नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प संक्षिप्त माहिती**

**१. प्रकल्पाचा उद्देश:**

हवामान बदलामुळे होणाऱ्या परिणामांना तोंड देण्यासाठी शेतकऱ्यांना सक्षम करणे.

मृद व जलसंधारण तंत्रांचा वापर करून शेती उत्पादनक्षमता वाढवणे.

खारपट्टी आणि कमी सुपीक जमीन असलेल्या भागांमध्ये सुधारणा करणे.

**२. योजनेतील आर्थिक तरतूद:**

हा प्रकल्प विश्व बँक (थीश्रव इरपज्ञ) व महाराष्ट्र शासनाच्या सहकार्याने राबविण्यात येतो.

पहिल्या टप्प्यात अंदाजे ₹४,००० कोटींची तरतूद करण्यात आली होती.

दुसऱ्या टप्प्यात देखील ६,००० कोटी निधी देण्यात येणार आहे.

**३. योजनेचा लाभ कोणाला मिळतो?**

शेतकरी उत्पादक कंपन्या (त्रझउ), सहकारी संस्था आणि गाव पातळीवरील शेतकरी गट.

प्रामुख्याने खारपाणपट्ट्यांमध्ये शेती करणाऱ्या शेतकऱ्यांना अधिक लाभ मिळतो.

जलव्यवस्थापन सुधारण्यासाठी ठिबक सिंचन, सेंद्रिय खतांचा वापर यासारख्या बाबींसाठी अनुदान दिले जाते.शासनाकडून निर्णयाची अपेक्षादर्यापूर तालुक्याला या योजनेत समाविष्ट करण्यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधी, शेतकरी संघटना आणि कृषी विभागाच्या वतीने पाठपुरावा सुरू आहे. शासनाने त्वरित निर्णय घेऊन या तालुक्याचा योजनेत समावेश करावा, अशी मागणी शेतकरी व कृषी क्षेत्रातील तज्ज्ञ करत आहेत.आता शासन काय भूमिका घेते याकडे संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागले आहे.

# दर्यापुरात शिवजयंतीनिमित्त धावले ८०० धावपटू

## सूर्योदय सामाजिक प्रतिष्ठानचा उपक्रम

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२५ दर्यापूर**

छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती सूर्योदय सामाजिक प्रतिष्ठानच्यावतीने साजरी करण्यात आली. त्यानिमित्ताने नुकताच शिव मॅरेथॉन स्पर्धा घेण्यात आली. राज्यभरातून १२ गटांत ८०० स्पर्धक सहभागी झाले होते. रिल्सस्टार बॉडी बिल्डर रोशन भजनकर, विनोदी कलावंत विशाल पिसाट, नवोदीत कलाकार सुशील लोणकर, केशव सोनोने आदींची यावेळी विशेष उपस्थिती होती. कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून आनंद जवंजाळ, तर उद्धाटक म्हणून आमदार गजानन लवटे तसेच प्रमुख पाहुणे म्हणून दर्यापूरचे पोलीस उपविभागीय अधिकारी राहुल गायकवाड, प्रा. अतुल पाटील, अॅड. गजानन पुंडकर, सुनील गावंडे, राजू कराळे, प्रभाकर कोरपे, विजय विल्हेकर, सुनिल राठी, प्रा. राम विघे उपस्थित होते. स्पर्धेत १० किमी १८ वर्षांवरील पुरुष गटात प्रथम पुरस्कार देवा धांडगे, द्वितीय महेंद्र वाळवे, तृतीय पुरस्कार मागल्या वाडवी यांनी पटकावला. ५ किमी महिला राखीव गटातील पुरस्कार अनुक्रमे सलोनी लव्हाडे, राधा नाकतोडे, पूजा सपकाळ यांनी पटकावले. १० किमी दर्यापूर

तालुका पुरुष गटातील पुरस्कार निखिल येवले, गिरिधारी बुंदेल, प्रसेनजित जामनिक, दर्यापूर तालुका ५ किमी महिला राखीव गटात वैष्णवी वानखडे, आरती हुशारे, उज्वला चव्हाण यांनी प्राप्त केला. ३ किमी १८ वर्षे आतील मुलांच्या गटात उजेर खान, ओम वाडेकर व प्रतीक गेडाम, तर मुलींमध्ये मनवा सावळे, भुमेश्वरी आखरे, अनुश्री शिंदे हिने प्राप्त केला. १ किमी १४ वर्षे आतील मुलांच्या गटात तेजस सपकाळ, सक्षम बुंदेले, सोहम जाधव, तर मुलींच्या गटात संस्कृती पळसपगार, मानवी पारवी, मोहिनी पारवी यांनी पुरस्कार प्राप्त केला. ५०० मीटर १० वर्षे आतील मुलांच्या गटात थोक पतरकाळे, तेजस अंबाडकर व गजानन चव्हाण, तर मुलींच्या गटात प्रकृती पळसपगार, प्रियल कापडे, समृध्दी पवार यांनी प्राप्त केला. ३ किमी ४० वर्ष पुरुष राखीव गटातून मल्लिकाअर्जुन पारडे, श्रीकृष्ण धापवार, गजानन चोरपगार, ३ किमी ३५ वर्षे महिला राखीव गटातून मीनाक्षी वाघमारे, वैशाली भगत व वीणा तायडे यांनी प्राप्त केला. सदर स्पर्धा यशस्वी करण्यासाठी सूर्योदय सामाजिक प्रतिष्ठानचे अध्यक्ष प्रा. आशिष देशमुख,विक्रम नळकांडे, किरण अरबट, डॉ. मनीष काळे, सूरज राऊत, गौरव सांगोले, प्रा. धनंजय देशमुख आदींनी परिश्रम घेतले.

# तीर्थक्षेत्र लाखपुरी येथे महाशिवरात्री महोत्सव निमित्त जय्यत तैयारी; ठाणेदार श्रीधर गुट्टे यांनी घेतला आढावा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२५दर्यापूर**

दर्यापूर व मुर्तीजापुरतालुक्याच्या सीमेवर पूर्णा नदी तीरावर असलेले पश्चिम विदर्भातील प्रसिद्ध तीर्थक्षेत्र लाखपुरी ता. मुर्तिजापूर जि. अकोला येथील साडेअकरा ज्योतिर्लिंग , ब्रह्म , विष्णू , महेश भगवान विराजमान असलेले असलेले श्री लक्षेश्वर शिवालय येथे दरवर्षीप्रमाणे महाशिवरात्री यात्रेनिमित्त जय्यत तयारी करण्यात आलेली आहे . मुर्तीजापुर ग्रामीण पोलीस स्टेशन निरीक्षक मा. श्रीधर गुट्टे यांनी तयारीचा आढावा घेतला.

बुधवार महाशिवरात्रीला भगवान लक्षेश्वरावर रात्री एक वाजता सार्वजनिक अभिषेक होईल . त्यानंतर भाविकांसाठी दर्शन व्यवस्था करण्यात येईल . सकाळी ११ वाजता तीर्थक्षेत्र लाखपुरी येथील विकास कामासाठी ४ कोटी रुपये निधी आणणारे मूर्तिजापूर मतदारसंघाचे आमदार मा. हरिषभाऊ पिंपळे यांचा शिवभक्तांच्या वतीने सत्कार समारंभ संपन्न होईल तसेच दरवर्षीप्रमाणे लाखपुरी येथील गुणवत्ता प्राप्त विद्यार्थी , राष्ट्रीय राज्यस्तरीय खेळाडू , विविध क्षेत्रातील प्राविण्य प्राप्त नागरिक , नवनियुक्त अधिकारी , कर्मचारी , सेवानिवृत्त कर्मचारी अधिकारी , सेवाधारी महिला मंडळ यांच्या सत्काराचे आयोजन करण्यात आले आहे .रात्री ७ वाजता शिव महापुराण कथा संपन्न होईल . गुरूवारी सकाळी १० वाजता ह भ प तुळशीदासजी धर्माळकर महाराज यांचे काल्याचे किर्तन व त्यानंतर महाप्रसाद वितरित करण्यात येईल . रात्री ७ वाजता श्रीची भव्य पालखी मिरवणूक निघेल . गुरुवारी सकाळी ९ वाजता पूर्णा नदी तीरावर दहीहंडी द्वारे महोत्सवाची सांगता होईल . श्री लक्षेश्वर संस्थांच्या वतीने येणाऱ्या भाविकांसाठी दर्शन व्यवस्था , गाडी पार्किंग व्यवस्था , फराळ व्यवस्था, पिण्याचे पाणी , मंडप व्यवस्था इत्यादी तयारी करण्यात आलेली आहे . सर्व शिवभक्तांनी महाशिवरात्रीनिमित्त आयोजित कार्यक्रमाचा लाभ घ्यावा असे आव्हान श्री लक्ष्मण संस्थांच्या वतीने करण्यात आलेले आहे.

# फेब्रुवारी महिन्यात महावितरणची कारवाई सहा हजार ग्राहकांचा वीज पुरवठा केला खंडित

## २३१ कोटी रूपयाच्या वीजबिलाच्या वसुलीसाठी महावितरणने केली मोहिम तीव्र

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२५अमरावती**

परिमंडळाअंतर्गत २३१ कोटी ५२ लाख वीजबिलाच्या वसुलीसाठी महावितरणने मोहिम तीव्र केली असून महावितरणच्या मोहिमेत वीजबिल भरण्याला प्रतिसादच न देणाऱ्या परिमंडळातील ६ हजार १४६ वीज ग्राहकांचा वीज पुरवठा खंडित करण्यात आला आहे. एकुण थकबाकी आणि पुन:र्जोडणी शुल्क भरल्याशिवाय या ग्राहकांचा वीज पुरवठा पुर्ववत करण्यात येणार नाही. त्यामुळे महावितरणची कटू कारवाई टाळण्यासाठी वीज ग्राहकांनी वीज बिल भरून सहकार्य करण्याचे आवाहन मुख्य अभियंता ज्ञानेश कुलकर्णी यांनी केले आहे. परिमंडळाअंतर्गत विविध वर्गवारीतील सुमारे १५ लाख ग्राहकांना महावितरणकडून वीज पुरवठा करण्यात येतो. तथापि जानेवारी अखेर कृषी ग्राहक, पाणीपुरवठा व पथदिव्याचे ग्राहक वगळून परिमंडळातील घरगुती,




वाणिज्यिक, औद्योगिक आणि इतर वर्गवारीतील वीज ग्राहकांकडे २३१ कोटी ५२ लाख रूपये वीजबिलाचे थकल्यामुळे महावितरणपुढे आर्थीक समस्या निर्माण झाली आहे. थकबाकीचा आकडा मोठा आहे. त्यामुळे महावितरणने महिन्याच्या पहिल्या दिवसापासूनच वीज बिल वसुली मोहिम अधिक तीव्र केली आहे.परिमंडळाअंतर्गत २३१ कोटी ५२ लाख रूपयाच्या थकीत विजबिलामध्ये अमरावती जिल्ह्यातील ११० कोटी ७५ लाखाचा समावेश आहे. तथापि २० फेब्रुवारी पर्यंत ३८ कोटी रूपयाचा वीजबिलाचा भरणा करण्यात आला आहे. त्याचबरोबर यवतमाळ जिल्ह्यात १२० कोटी ७७ लाख रूपयाच्या थकबाकीपोटी २५ कोटी रूपयाचा वीज बिल भरणा करण्यात आला आहे. परंतू महिन्याच्या उरलेल्या दहा दिवसात मोठी थकबाकी वसुल करावी लागणार असल्याने महावितरणने विजबिल वसुली मोहिमेला गती दिली आहे.

**कारवाईत ६ हजार १४६ वीज ग्राहकाचा वीज पुरवठा खंडित**

महावितरणच्या वीजबिल भरण्याला प्रतिसादच मिळत नसल्याने फेब्रुवारी महिन्याच्या २० दिवसात परिमंडळातील ६ हजार १४६ ग्राहकाचा वीज पुरवठा खंडित करण्यात आला आहे. यामध्ये अमरावती जिल्ह्यातील ३ हजार ८८ आणि यवतमाळ जिल्ह्यातील ३ हजार ५८ ग्राहकाचा समावेश आहे.

# विविध पंचायतसमितीमधील सेवानिवृत्त शिक्षकांचे अनेक प्रश्न प्रलंबित

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२५अचलपूर :**

विविध पंचायतसमित्यांमध्ये सेवानिवृत्त शिक्षकांचे अनेक प्रकरणे प्रलंबित असून सदर प्रलंबित प्रश्नांची माहिती संबंधित पं.स.चे गटविकास अधिकारी, गटशिक्षणाधिकारी यांना देऊन सदर समस्या निकाली काढण्यासाठी संघटनेचे जिल्हाध्यक्ष व्ही. बी. तुरखडे यांच्या नेतृत्वात संघटनेचे पदाधिकारी आणि सदस्य विविध पंचायतसमितीमध्ये पेन्शन अदालत घेत आहेत. त्या अनुषंगाने अमरावती पं. स. मध्ये तालुका पेंशन अदालत पार पडली.

अध्यक्षपदी सहायक प्रशासन अधिकारी डाखोरे होते. पेशन अदालतमध्ये सुधाकरअमरावती पं. स. मध्ये पेन्शन अदालतबिजवे, अशोक श्रीराव, नूर महम्मद शे. पिरण, सुभाष मेटी, किशन चनगोडे, एम.



एम. टाके, बाबुराव वनवे, अंजनाबाई बिजवे आदि सेवानिवृत्त शिक्षकांचे प्रश्न प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले आहे.सदर काही सेवानिवृत्त शिक्षकांचे प्रश्न १ जानेवारी २००६ ते २६ फेब्रुवारी २००९ या काळातील सुधारित निवृत्ती वेतन वाढ याबाबतचे आहे. काही प्रश्न कुटुंब निवृत्तीवेतनाबाबत आणि नियत वयोमानानुसार अनुषंगिक वाढीचे आहे. इत्यादी प्रश्न जिल्हा सेवानिवृत्त शिक्षक संघटनेचे अध्यक्ष व्ही. बी तुरखडे, कार्याध्यक्ष एच. पी. खौर व सरचिटणीस एस आर. भोबे आदीनी पेशन अदालतमध्ये मांडले. सदर प्रलंबित प्रकरणे एक महिन्यात सोडविण्याचे व निकाली काढण्याचे प्रशासनाने आश्वासन दिले.पेंशन अदालतमध्ये प्रशासनातर्फे डाखोरे सहा. प्रशासन अधिकारी पं. स. अमरावती, विद्याताई पेठे कनिष्ठ प्रशासन अधिकारी, राठोड मॅडम कनिष्ठ सहायक, तेलगोटे मॅडम कनिष्ठ सहायक, केवटे कनिष्ठ सहायक, तसेच देविदास पोलादे, उत्तमराव बोराडे, सुधाकर बिजवे, बुरंगे, महल्ले, राखोंडे, रायपुरे, अशोक श्रीराव, बाबुराव वनवे, दयाराम काळकर, किसन चनगोडे, मधुकर टाके, श्रीमती पुष्पाताई नेरकर आदी सेवानिवृत्त शिक्षक उपस्थित होते.

# गरीब कैद्यांनाही आता जामीन

## गरीब कैद्यांसाठी योजना ठरणार फायद्याची केंद्र सरकार भरणार जामिनाची रक्कम

**अरुण जोशी**



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२५अमरावती**

केंद्र सरकारने सामाजिकदृष्ट्या वंचित, कमी उत्पन्न गटातील आणि आर्थिकदृष्ट्या कमजोर कैद्यांसाठी गरीब कैदी मदत योजना' लागू करण्याचा निर्णय घेतला आहे. या योजनेअंतर्गत अशा कैद्यांना जामिनासाठी आवश्यक असलेली रक्कम केंद्र सरकारकडून भरली जाणार आहे. त्यामुळे कैद्यांना अनावश्यक तुरुंगवास भोगण्याच्या स्थितीतून मुक्ती मिळणार आहे.

विविध स्वरूपातील गुन्ह्यांमध्ये अडकून कारावास भोगत असलेल्या कैद्यांना कालांतराने न्यायालयाकडून जामीन मंजूर केला जातो. परंतु त्यासाठी गुन्ह्यानुसार ठराविक रक्कम अदा करावी लागते. त्यानुसार, अनेक कैद्यांचे कुटुंब पैशांची तजवीज करून कैद्यांना सोडवितात. मात्र, जामीन मंजूर होऊनही पैशाअभावी अनेकजण तुरुंगात अडकून राहतात. अशा गरीब कैद्यांसाठी सरकारकडून जामिनाची रक्कम भरली जाणार आहे.ज्यांना शिक्षा झालेली आहे आणि जामिनावर सुटण्याची संधी नाही, पण आर्थिक मदतीच्या अभावामुळे शिक्षेच्या कालावधीनंतरही तुरुंगात राहावे लागते, अशांना योजनेचा फायदा होणार आहे.या योजनेच्या अंमलबजावणीसाठी जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाकडे (डीएलएसए) जबाबदारी सोपविण्यात आली आहे. संबंधित प्राधिकरण पात्र कैद्यांची निवड करून त्यांना कायदेशीर मदत आणि जामिनासाठी आवश्यक रक्कम उपलब्ध करून देईल.

**कारागृहावरील ताण आता हलका होणार**

केंद्र शासनाच्या योजनेमुळे सामाजिकदृष्ट्या वंचित, कमी उत्पन्न गटातील कैद्यांना मोठा दिलासाने कारागृहावरील ताण कमी होणार आहे.योजनेसाठी केंद्र सरकारने भरीव निधी मंजूर केला आहे. प्रत्येक पात्र कैद्याला जामिनासाठी आवश्यक असलेली संपूर्ण रक्कम दिली जाणार असल्याची माहिती प्राप्त झाली.

# पाच रुपये द्या नाही, तर गरम पाणी प्या....

## बाटली बंद पाण्यासाठी द्यावे लागताहेत जादा पैसे



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२५अमरावती**

बाटली बंद पाण्याच्या नावाखाली शहरातच नव्हे, तर गाव खेड्यात देखील अगदी गल्ली-बोळांमध्ये फिल्टरचे पाणी अगदी सहज मिळत आहे. यात एसटी महामंडळासह रेल्वे विभाग देखील मागे राहिलेला नाही. महाराष्ट्र राज्य एसटी महामंडळ आणि रेल्वे विभागाने देखील प्रवाशांकरिता नाथजलच्या आणि रेल नीर नावाने बाटली बंद पाणी सेवा सुरू केली आहे. यातून एसटी किंवा रेल्वेचा पैसा कमावण्याचा उद्देश नसला तरी, पाणी विक्रीचे टेंडर दिलेल्या पाणी विक्रेत्यांकडून प्रवाशांना १५ रुपयांची पाण्याची बॉटल २० रुपये, अशा चढ्या दराने विक्री करण्यात येत आहे.

**तक्रार कोठे करायची?**

एसटी महामंडळ असो की, रेल्वे स्थानक दोन्ही ठिकाणी स्थानक प्रमुख असतो. स्थानक प्रमुख हे प्रवाशांच्या अडचणी आणि समस्या जाणून घेणे, परिसरातील हालचालींवर करडी नजर ठेवणे व समस्यांचे निवारण करणे हे मुख्य काम करतात. यांच्याकडे तक्रार करता येते. मात्र अनेकांना प्रवासाची घाई असल्याने कुणी तक्रार करत नाही हे विशेष.

# महाशिवरात्री सणानिमित्त बाजारात रताळ्यांची मोठ्या प्रमाणात आवक

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२५अमरावती**



महाशिवरात्री सणानिमित्त बाजारात रताळ्यांची आवक झाली. मात्र, ही आवक फारशी नव्हती. महाशिवरात्रीच्या पर्वावर रताळे खरेदीची लगबग दिसून आली. शनिवारी शहरातील बाजारपेठेत रताळ्यांना १०० रूपये किलो दर होता. आज रविवारी भरलेल्या आठवडी बाजारात ८० रूपये किलो दराने रताळ्यांची विक्री सुरू होती.

दोन दिवसांवर आलेल्या महाशिवरात्री सणाच्या पार्श्वभूमीवर रविवारच्या आठवडी बाजारात विशेषत:उपवासाच्या पदार्थांना मागणी होती. रताळे, फळांसह साबूदाणा, शेंगदाणे, राजगिरा लाडू खरेदीसाठी बाजारात ग्राहकांची लगबग सुरू होती. दुसरीकडे, भाज्यांचे दर स्थिर होते तर कलिंगड, द्राक्षांसाठी गर्दी होती. बटाट्याचे दर स्थिर होते. प्रतिकिलो ३० रूपयांप्रमाणे बटाट्यांची विक्री आठवडी बाजारात सुरू होती.

# संचमान्यता संबंधाने सकारात्मक निर्णय घेण्याबाबत शिक्षणमंत्र्यांचे आश्वासन

## प्राथमिक शिक्षक समितीच्या शिष्टमंडळाने घेतली शिक्षणमंत्री व शिक्षण राज्यमंत्र्यांची भेट

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२५अमरावती**

महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समिती च्या राज्य पदाधिकाऱ्यांनी आज मंगळवारी (दि. २५ फेब्रुवारी) राज्याचे शालेय शिक्षण मंत्री ना. दादाजी भुसे साहेब, शिक्षण राज्यमंत्री ना. डॉ. पंकजभाऊ भोयर साहेब यांचेसह शालेय शिक्षण विभागाचे उपसचिव तुषार महाजन साहेब यांची भेट घेतली. २०२४-२५ च्या संचमान्यतेमुळे अतिरिक्त होणारे शिक्षक व विद्यार्थ्यांची अडचण यासह अनेक प्रलंबित विषयवार चर्चा झाली. संचमान्यतेसंबंधाने (इयत्ता ६-८) तातडीने आवश्यक अशी अनुकूल कार्यवाही करण्याचे मान्यवरांनी मान्य केले.

# ऊर्जादायी गाण्याचे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्या शुभहस्ते विमोचन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२५मुंबई**



भारतीय जनता पार्टीचं महाराष्ट्रात सध्या संघटन पर्व सुरु आहे ज्यामध्ये दीड कोटी सदस्य बनविण्याचे पक्षाने उद्दिष्ट ठेवले असून विविध माध्यमांतून महाराष्ट्रातील जनतेला भाजपाची विचारधारा पोहोचवून पक्षाकडे आकर्षित करण्याचे ध्येय ठेवण्यात आले आहे, त्याचाच एक भाग म्हणून भाजपचे महाराष्ट्र प्रदेश कार्याध्यक्ष रविंद्र चव्हाण यांच्या संकल्पनेतून भाजपा स्फूर्तिगीत तयार करण्यात आले आहे. या ऊर्जादायी गाण्याचे विमोचन महाराष्ट्राचे मुख्यमंत्री आदरणीय देवेंद्रजी फडणवीस यांच्या शुभहस्ते सदस्यता महा अभियान २०२५ अंतर्गत आयोजित संघटन पर्व कार्यशाळा या भव्य कार्यक्रमात करण्यात आले.भारतीय जनता पार्टी जगातील सर्वात मोठा राजकीय पक्ष असून सर्वप्रथम राष्ट्र नंतर पक्ष व शेवटी स्वतः ही भारतीय जनता पार्टीची विचारधारा सामान्य लोकांपर्यंत पोहचावी आणि देशाचे लाडके पंतप्रधान नरेंद्र मोदीजी व महाराष्ट्रात मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्या नेतृत्वातील पक्षाला कार्यकर्त्यांचे अधिकाधिक बळ देण्यासाठी पक्ष संघटना मजबूत करण्याचं काम भाजपा करत आहे. भाजपा पक्ष देशाला विकासाची दिशा देण्याचं काम करत आहे त्यामुळे त्यात जास्तीतजास्त लोक जोडून यावेत यासाठी स्फूर्तिगीताची कल्पना राबविण्याचा निर्णय घेतल्याचे प्रदेश कार्याध्यक्ष रविंद्र चव्हाण यांनी सांगितले.

# त्र्यंबकेश्वरमधील प्राजक्ता माळीचा 'शिवस्तुती नृत्याविष्कार' कार्यक्रम वादाच्या भोवऱ्यात

## सेलिब्रिटींच्या इव्हेंटची मंदिरात परंपरा नाही, माजी विश्वस्तांकडून आक्षेप

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२५त्र्यंबकेश्वर**



महाशिवरात्रीनिमित्त देशभरात कार्यक्रमांचं आयोजन केलं जात आहे. अशातच नाशिकच्या त्र्यंबकेश्वरमध्येही महाशिवरात्रीनिमित्त कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलंय. महाशिवरात्रीला संध्याकाळी मंदिराच्या प्रांगणात मराठी अभिनेत्री आणि नृत्यांगणा प्राजक्ता माळी हिच्या 'शिवस्तुती नृत्याविष्कार' कार्यक्रमाचं आयोजन करण्यात आलं आहे. पण, आता याच कार्यक्रमावरुन वादाला तोंड फुटल्याचं दिसत आहे. महाशिवरात्रीनिमित्त त्र्यंबकेश्वरमध्ये होणाऱ्या प्राजक्ता माळीच्या कार्यक्रमाला विरोध होत आहे. सेलिब्रिटींच्या इव्हेंटची मंदिरात परंपरा नाही, असं पत्र मंदीर समितीचे माजी विश्वस्त ललिता शिंदे यांनी नाशिक ग्रामीण पोलिसांना लिहिलं आहे.

देशभरातील बारा ज्योर्तिलिंगांपैकी एक असलेल्या त्र्यंबकेश्वरमध्ये महाशिवरात्री निमित्त अनेक कार्यक्रमांचं आयोजन दरवर्षी केलं जातं. अशातच यंदा महाशिवरात्रीनिमित्त मराठी अभिनेत्री प्राजक्ता माळी हिच्या 'शिवस्तुती नृत्याविष्कार' कार्यक्रम देवस्थान ट्रस्टनं आयोजित केला आहे. पण, या कार्यक्रमावर मात्र, माजी विश्वस्तांनी नाराजी व्यक्त केली आहे. तसेच, यासंदर्भात ग्रामीण पोलिसांत एक पत्र देखील दिलं आहे.

सेलिब्रिटींच्या इव्हेंटची मंदिरात परंपरा नाही, चुकीचा पायंडा पाडू नये, मंदिरातील धार्मिक वातावरण बिघडू नये अशी आमची इच्छा, अशी मागणी करणारं पत्र माजी विश्वस्त ललिता शिंदे यांनी नाशिक ग्रामीण पोलिसांना लिहिलं आहे.

**सेलिब्रिटींच्या इव्हेंटची मंदिरात परंपरा नाही : माजी विश्वस्त**

माजी विश्वस्त ललिता शिंदे यांनी यासंदर्भात एबीपी माझाला यासंदर्भात प्रतिक्रिया दिली. त्या म्हणाल्या की, अतिशय पवित्र दिवस आहे हा महाशिवरात्रीचा. त्यामुळे इथे धार्मिकच कार्यक्रम आयोजित झाले पाहिजे. जरी, प्राजक्ता माळी तिथे 'शिवस्तुती नृत्याविष्कार' सादर करणार असेल, तरीदेखील याचा इथे पुर्नविचार झाला पाहिजे. मी स्वतः माजी विश्वस्त आहे, शास्त्रीय नृत्य ठेवलं पाहिजे, कथ्थक नृत्य ठेवलं पाहिजे, पण सेलिब्रिटींना आणून त्रंबकेश्वरमध्ये एक वेगळाच पायंडा त्रंबकेश्वर देवस्थानाच्या ट्रस्टनं सुरू केला आहे. जे अत्यंत चुकीचं घडत आहे, त्यामुळे हे थांबलं पाहिजे आणि तात्काळ यामध्ये बदल झाला पाहिजे...

दरम्यान, महाशिवरात्री निमित्त मंदिर विश्वस्तांच्या वतीनं मराठी अभिनेत्री प्राजक्ता माळी हिच्या 'शिवस्तुती नृत्याविष्कार' या कार्यक्रमाचं आयोजन करण्यात आलं आहे. आता माजी विश्वतांनी या कार्यक्रमावर आक्षेप घेतल्यामुळे प्राजक्ता माळीचा कार्यक्रम रद्द होणार का? हे पाहणं महत्त्वाचं ठरणार आहे.

# मजुरांचा तुटवडा; रब्बी शेतमाल होतोय खराब

## पीक काढण्यासाठी बाहेरील मजुरांचा घ्यावा लागतो आधार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२५ धा.रेल्वे**



गत चार वर्षापासून जिल्ह्यात हरभरा पिकाचा बोलबाला आहे. यंदा सरासरी २० हजार हेक्टरवर हरभरा पिकाची लागवड झाली आहे. त्या खालोखाल गहू पिकाची सरासरी १२ हजार हेक्टरवर पेरणी झाली आहे. सध्या हरभरा व गहू पीक परिपक्व झाले आहे. परंतु, पुरेशा प्रमाणात शेतमजूर मिळत नसल्याने जिल्ह्यात हाहाकार उडत आहे.

तरुण पिढी शेतात राबण्यास तयार नसल्याने अडचणी वाढल्या आहेत. बाहेरील मजुरांवर शेतीची भिस्त अवलंबून आहे. जिल्ह्यात हरभरा व गहू पिकांची वेळेवर कापणी न झाल्याने दाणादाण झाली आहे. हंगामातीलअखेरच्या टप्प्यात पीक कापणीसाठी मजूर मिळत नसल्याने शेतशिवारात पीक 'जैसे थे' आहेत. हरभरा पिकाच्या कापणीसाठी बाहेर जिल्ह्यातून मजूर बोलताते लागत आहेत.

**मजुरी पोहचली ३०० रुपयांवर**

अद्यापही शेतात हरभऱ्याचे पीक कापणीअभावी उभे आहे. मजुरांची संख्या दिवसेंदिवस रोडावत आहे. त्यामुळे हतबल ठरलेल्या शेतकऱ्यांना बाहेर जिल्ह्यातून मजूर आणावे लागत आहेत. महिलांची प्रतिदिवसाला ३०० रुपये मजुरी द्यावी लागत आहे. शिवाय मजुरांच्या वाहतुकीचा खर्च वेगळा करावा लागत आहे. यावर्षी हरभरा पिकाचा उतारा एकरी ४ ते ५ क्विंटलपर्यंत असून, बाजारभाव ५ ते ६ हजारांपर्यंत मिळत आहे.

# महाशिवरात्रीसाठी मागणी वाढली; श्रीफळ वधारले नारळाच्या किमतीत झाली वाढ, ग्राहकांना फटका



**विदर्भ प्रजासत्ताक दि.२५अमरावती**

देवकार्य, लग्नसमारंभ तसेचइतर कार्यासाठी लागणाऱ्या नारळाने आता तिशी पार केली आहे. त्याचे दर मध्यंतरीच्या काळात २० रुपयांपर्यंत स्थिरावले होते. परंतु लग्नसराई तसेच देवकार्यासाठी नारळाच्या मागणीत वाढ झाल्याने नारळाच्या दरातदेखील वाढ झाल्याचे बघायला मिळत आहे. त्यामुळे नारळाचे दर २५ ते ३५ रुपयांपर्यंत पोहोचले आहेत.

२० रुपयांपर्यंत मध्यंतरी नारळाचे भाव स्थिरावले होते. डिसेंबर ते फेब्रुवारी या कालवधीत यात्रा-उत्सव, जयंती, लग्नसराई जोमात असल्याने मागणीवाढली आहे. सध्या महाशिवरात्रीनिमित्त भाविक मोठ्या प्रमाणात नारळ खरेदी करतात. मात्र भाव वाढल्याने ग्राहकांना थोडाफार आर्थिक फटका बसणार आहे.

**तापमान वाढल्याने नारळाचा माल कमी**

सध्या तापमान वाढत आहे. उष्णतेमुळे नारळ खराब होतात. त्यामुळे होलसेल विक्रेत्यांकडून नारळाचा माल थोडा-थोडा मागविला जात आहे, अशी माहिती व्यावसायिकांनी दिली

**शिवरात्र, होळीत मागणी अधिक वाढेल**

सध्या महाशिवरात्रीचा महिना सुरू आहे. यावेळी मोठ्या प्रमाणात नारळांची विक्री होत असते. तसेच पुढील महिन्यात होळीलादेखील नारळांच्या मागणीत वाढ होत असल्याने महाशिवरात्र, गुढीपाडवा व होळीला नारळांचे भाव वाढण्याची शक्यता विक्रेत्यांनी व्यक्त केली.

# नाशिकमध्ये महाशिवरात्रीला रामकुंडावरील वाहतूक बंद

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२५नाशिक**



रामकुंड परिसरातील कपालेश्वर मंदिरात महाशिवरात्रीला भाविकांची गर्दी पाहता वाहतुकीस मज्जाव करण्यात आला आहे. बुधवारी (दि.२६) पहाटे पाच ते रात्री १२ वाजेपर्यंत रामकुंडावर येणाऱ्या वाहनांचा प्रवेश नसेल.

कपालेश्वर मंदिर, पंचवटी कारंजा, ढिकले वाचनालय, सदरदार चौक-काळाराम मंदिर या मार्गाने मिरवणुका काढण्यात येणार आहेत. या मार्गावर वाहतुकीची कोंडी होऊ नये यासाठी वाहतूक बंद असेल. हातगाड्या, बैलगाड्या, सायकल, मोटार सायकल, मोटार गाड्या व इतर सर्व प्रकारच्या वाहनांना या परिसरात प्रवेश दिला जाणार नाही.

**या मार्गावरील वाहतूक बंद**

ढिकले सार्वजनिक वाचनालयाकडून कपालेश्वर मंदिराकडे जाणारी वाहतूक बंद असेल. मालेगाव स्टॅण्डकडून कपालेश्वर मंदिराकडे, सरदार चौकाकडून कपालेश्वर मंदिराकडे जाणारी, गाडगे महाराज पुलाकडून कपालेश्वर मंदिराकडे येणारी, महाराष्ट्र आयर्न वर्क्सकडून खांदवे सभागृहाकडे जाणारी तसेच मालवीय चौकाकडून खांदवे सभागृहाकडे जाणारी वाहतूक बुधवारी दिवसभर बंद असेल.